cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१४४ | शुक्रवार, दि.१९ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### वैचारिक प्रगल्भता रुजविण्याची जबाबदारी सगळ्यांचीच

जगाच्या केंद्रस्थानी सध्या जेन झी पिढी आहे. जेन झी म्हणजे झुमर्स. म्हणजे १९९७ ते २०१२ च्या दरम्यान जन्मलेली मुले-मुली. या पिढीने अनेक देशांमध्ये कसे सत्तांतर घडवले याच्या जोरदार चर्चा सद्या सुरु आहेत. त्यात कौतुकच जास्त आढळते. सर्जनशील युवाशक्तीच्या बळावर कोणताही देश विकासाची स्वप्ने पाहू शकतो. भारत तर विश्वगुरू होण्याची महत्वाकांक्षा राखून आहे. तथापि वैचारिक परिपक्वतेअभावी आणि ते ज्यांना नेते मानतात त्यांचे प्रभावशाली नियंत्रण नसेल तर ही पिढी भरकटत जाण्याचा आणि त्यांनी छेडलेले कोणतेही आंदोलन दिशाहीन होण्याचा धोका कोणीही नाकारणार नाही.

### मालेगाव बॉम्बस्फोटाचा निकाल रद्द करण्याची याचिकाकर्त्यांची विनंती

मुंबईः २००८ च्या मालेगाव बॉम्बस्फोटातील पीडितांच्या कुटुंबीयांनी दाखल केलेल्या याचिका मुंबई उच्च न्यायालयाने दाखल करून घेतल्या आहेत. न्यायालयाने राष्ट्रीय तपास संस्था आणि निर्दोष सुटलेल्या आरोपींना नोटीस बजावली असून, या प्रकरणाची सुनावणी सहा आठवड्यांनी निश्चित केली आहे. ३१ जुलै रोजी विशेष एनआयए न्यायालयाने मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली होती. बॉम्बस्फोटातील पीडित कुटुंब निसार अहमद सय्यद बिलाल आणि कुटुंबातील इतर पाच सदस्यांनी वकील मतीन शेख यांच्यामार्फत एनआयए न्यायालयाच्या निकालास आव्हान दिले आहे. हा निकाल रद्द करण्याची विनंती याचिकाकर्त्यांनी केली आहे.

# बळीराजा संकटात, राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा !

## शरद पवार राष्ट्रवादीकडून मागणी, जयंत पाटलांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील विविध भागात सध्या मुसळधार पाऊस कोसळत आहे. या पावसामुळे अनेक भागात पूर आले आहेत. यामध्ये शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. घरे, जनावरे गोठे यांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. याच मुद्यावरुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहले आहे. बळीराजा इतक्या अडचणीत असताना या सरकारच्या हृदयाला पाझर कसा फुटत नाही? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. सरकारने राज्यात तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत जारी करावी, ▶▶ पान २ वर



### शेतकऱ्यांपुढे अनेक प्रश्न

अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ढिसाळ कार्यपध्दतीमुळे पंचनामे वेळेत होत नसून त्याची माहिती सर्व शेतकऱ्यांना दिली जात नाही. पंचनामे झाले तरी वास्तव नुकसानाचे योग्य मुल्यमापन होत नसल्याने शेतकऱ्यांच्या मनात तीव्र संताप निर्माण झाला आहे. पाऊस सर्वत्र पडलेला असल्यामुळे नुकसानही सर्वच शेतकऱ्यांचे झाले आहे. बँकांचे हप्ते कसे फेडायचे, मुलांचे शिक्षण कसे करायचे असे प्रश्न पिडीत शेतकरी करत आहेत, असे पत्रात म्हटले आहे.

### पंचनाम्यात वेळ घालवू नका, सरसकट मदत द्या

पीकविमा कंपन्यांवर दबाव आणून शेतकऱ्यांना तातडीने विमा दावे अदा करण्याचे आदेश द्यावेत. बँकाकडून होत असलेली वसुलीची कार्यवाही तात्काळ थांबवावी. शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त बियाणे व खतांचा पुरवठा उपलब्ध करुन द्यावा असेही जयंत पाटील म्हणाले. सरकारने पंचनाम्याच्या नावाखाली वेळकाढूपणा थांबवावा आणि शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत जाहीर करावी. केवळ पीक नुकसान नव्हे तर जनावरांचे, घरांचे व गोठ्यांचे नुकसान यासाठीही मदत जाहीर केली जावी, जयंत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना लिहलेल्या पत्रात म्हटले आहे.

## थोडक्यात...

### बदल केलेल्या नव्या जीएसटी दराची अधिसूचना जारी

दिल्लीः केंद्राने वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) साठी नवीन दर अधिसूचित केले, जे २२ सप्टेंबरपासून लागू होतील. अर्थ मंत्रालयाने ही अधिसूचना जीएसटी परिषदेच्या ३ सप्टेंबर रोजी झालेल्या ५६ व्या बैठकीत केलेल्या शिफारशींनंतर जारी केली आहे आणि २८ जून २०१७ च्या अधिसूचना रद्द केली आहे. यासह, केंद्राने जीएसटी अंतर्गत दर कपात प्रभावी करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल पुढे टाकले आहे. पुढील काही दिवसांत राज्य जीएसटी अंतर्गत नवीन दर लागू करण्यासाठी प्रत्येक राज्य स्वतंत्र अधिसूचना देखील जारी करेल.

### त्या विमान अपघाप प्रकरणी अमेरिकेत खटला दाखल

अहमदाबादः अहमदाबादमध्ये या वर्षी जून महिन्यात झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ४ प्रवाशांच्या नातेवाईकांनी अमेरिकेत खटला दाखल केला आहे. या खटल्यात त्यांनी विमान उत्पादक कंपनी बोईंग आणि सुटे भाग बनवणाऱ्या हनीवेल कंपनीवर निष्काळजीपणाचा गंभीर आरोप केला आहे. अहमदाबादहून लंडनला जाण्यासाठी उड्डाण घेतल्यानंतर काही वेळातच बोईंग ७८७ हे विमान कोसळले. या दुर्घटनेत २२९ प्रवासी, १२ विमान कर्मचारी यांसह १९ रहिवाशांचा मृत्यू झाला होता. तर केवळ एक प्रवासी बचावला.

### हिंडनबर्ग प्रकरणी सेबीची अदाणी ग्रुपला क्लीन चिट

मुंबई : अमेरिकन शॉर्ट–सेलिंग फर्म हिंडेनबर्गने अदाणी ग्रुपवर लावलेले आरोप सिद्ध होऊ शकले नाहीत, असे स्पष्ट करत सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया अर्थात सेबीने गुरुवारी हिंडेनबर्ग प्रकरणात अदाणी ग्रुपला क्लीन चिट दिली. सेबीने अंतिम आदेशात म्हटले की, हिंडेनबर्गने अदाणी ग्रुपविरुद्ध केलेले इनसायडर ट्रेडिंगचे आरोप सिद्ध झाले नाहीत. तसेच संबंधित व्यवहारांमध्ये कोणतीही अनियमितता आढळली नाही. यामुळे अदाणी ग्रुपचे अध्यक्ष गौतम अदाणी, त्यांचे भाऊ राजेश अदाणी, अदाणी पोर्ट्स, अदाणी पॉवर आणि ॲडिकॉर्प एंटरप्रायझेस यांना दोषमुक्त करण्यात येत आहे.

### सोलापुरात पावसाने हाहाकार

सोलापूर : सोलापूरच्या बार्शी तालुक्यातील बालाघाटात मुसळधार पाऊस होत आहे. सध्या बालाघाटच्या डोंगररांगा आणि परिसरात जोरदार पाऊस सुरु आहे. त्यामुळे उत्तर भागातून वाहणाऱ्या चांदनी नदीला महापूर आला आहे. चांदनी नदीला महापूर आल्याने मांडेगाव, कांदलगाव, देवगावसह जवळपास आठ गावातील हजारो हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली आहेत. तसेच या परिसरातील अनेक लघु प्रकल्प हे भरले आहेत. कळंब तालुक्यातील बांगरवाडी, बार्शी तालुक्यातील चारे वालव, काटेगाव आणि कळंबवाडी हे प्रकल्प पूर्ण भरले आहेत. तसेच, बाभूळगाव हा बृहत लघु प्रकल्पही मागील महिन्यातच पूर्ण क्षमतेने भरला आहे. या पाण्याखाली सोयाबीन, उडीद, मका, कांदा आणि ऊस यांसारखी पिके पूर्णपणे बुडाली आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच कांदलगावामध्ये परिस्थिती अधिक गंभीर आहे.

# मराठा आरक्षणाविरोधातील याचिका फेटाळली

## मराठा समाजाला दिलासा, सदर याचिका जनहित याचिकेच्या कक्षेत बसत नसल्याचे निरीक्षण



मुंबई । प्रतिनिधी

**मराठा समाजाला दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीला मान्यता देणाऱ्या शासन निर्णयाविरोधातील पहिली जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. २ सप्टेंबरच्या शासन निर्णयाविरोधात ॲड.विनीत धोत्रे यांनी ही याचिका दाखल केली होती. सदर याचिका जनहित याचिकेच्या कक्षेत बसत नसल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले आहे.**


हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला मान्यता देणाऱ्या शासन निर्णविरोधातील याचिकेवर गुरूवारी मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. ॲड. विनीत धोत्रे यांनी दाखल ▶▶ पान २ वर

### याचिकाकर्ते सुप्रीम कोर्टात जाणार

मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला याचिकाकर्ते सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार आहेत. २ सप्टेंबरच्या शासन निर्णयाविरोधात दाखल केलेली याचिका जनहित याचिकाच असल्याच्या मतावर याचिकाकर्ते ठाम आहेत. याचिका जनहित याचिकेच्या कक्षेत बसत नसल्याच सांगत मुंबई उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली. हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीला मान्यता देणाऱ्या शासन निर्णयाविरोधातील पहिली जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर याचिकाकर्त्यांनी भूमिका मांडली आहे.

# अंतरवालीच्या दंगलीत शरद पवारांचा आमदार!

## भुजबळांकडून गंभीर आरोप; मुंख्यमंत्री फडणवीस यांचे केले कौतुक



नागपूर । प्रतिनिधी

अंतरवाली सराटीमध्ये पोलिसांवर दगडफेक झाली, त्याचे नियोजन आदल्या रात्री झाले होते. त्या बैठकीला शरद पवारांचा आमदार उपस्थित होता, असा गंभीर आरोप मंत्री छगन भुजबळांनी केला. मंत्रिमंडळात एकमेव आशेचा किरण आहे तो म्हणजे देवेंद्र फडणवीस. त्यांनी ओबीसी समिती दिली, समाजाला निधी दिला अशा शब्दात त्यांनी मुख्यमंत्र्यांवर स्तुतीसुमने उधळली. छगन भुजबळ यांनी नागपूर मध्ये समता परिषदेच्या कार्यकर्ता संवाद बैठकीचे आयोजन केले होते०. त्यावेळी छगन भुजबळ बोलत होते.

अंतरवाली सराटीमध्ये मनोज जरांगे यांचे आंदोलन सुरू असताना त्यावेळी पोलिसांनी लाठीमार केला होता. त्यामध्ये अनेक महिला तसेच लहान मुलेही जखमी झाले. त्यानंतर उपस्थित जमावाने पोलिसांवर दगडफेक केली. त्याच घटनेवरून छगन भुजबळांनी थेट पवारांवर निशाणा साधला. छगन भुजबळ म्हणाले की, अंतरवाली सराटीत ८३ पोलिसांवर दगडफेक झाली. त्याचा प्लॅन आदल्या रात्री ठरला. त्यावेळेस पवार साहेबांचा एक ▶▶ पान २ वर

# मालेगाव बॉम्बस्फोट : एनआयएसह निर्दोष मुक्तता झालेल्यांना हायकोर्टाने बजावली नोटीस



मुंबई । प्रतिनिधी

**२००८ च्या मालेगाव बॉम्बस्फोटातील पीडितांच्या कुटुंबीयांनी दाखल केलेल्या याचिका मुंबई उच्च न्यायालयाने दाखल करून घेतले आहे. न्यायालयाने राष्ट्रीय तपास संस्था आणि निर्दोष सुटलेल्या आरोपींना नोटीस बजावली असून, या प्रकरणाची सुनावणी सहा आठवड्यांनी निश्चित केली आहे.**


३१ जुलै रोजी विशेष एनआयए न्यायालयाने मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली होती. बॉम्बस्फोटातील पीडित कुटुंब निसार अहमद सय्यद बिलाल आणि कुटुंबातील इतर पाच सदस्यांनी वकील मतीन शेख यांच्यामार्फत एनआयए न्यायालयाच्या निकालास आव्हान दिले आहे. हा निकाल रद्द करण्याची विनंती याचिकाकर्त्यांनी केली आहे. २९ सप्टेंबर २००८ रोजी महाराष्ट्रातील मालेगाव येथील एका मशिदीजवळ मोटारसायकलला बांधलेल्या बॉम्बचा स्फोट झाला होता. यामध्ये सहा ▶▶ पान २ वर

# निवडणूक आयुक्तांकडून लोकशाहीच्या हत्याऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न

## राहुल गांधी यांचा आरोप, कर्नाटक, महाराष्ट्रात बेकायदेशीर पद्धतीने मतदारांची नावे डिलीट

दिल्ली । वृत्तसंस्था

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरूवारी पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोगाकडून लोकशाहीच्या हत्याऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत एक टीम असून त्याच टीमकडून महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि हरयाणात मतदार यादीतील काँग्रेस आणि विरोधी पक्षांना मतदान करणाऱ्या मतदारांची नावे मतदार यादीतून जाणीपूर्वक डिलीट करण्यात आले आहेत. काही ठिकाणी मतदारांची नावे चुकीच्या पद्धतीने समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप केला. तसेच केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार हे अशा लोकशाहीच्या हत्याऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही राहुल गांधी यावेळी केला.



यावेळी राहुल गांधी यांनी कर्नाटकातील आनंद मतदार संघातील मतदारांची नावे कशा पद्धतीने डिलीट झाली याची माहिती देताना सांगितले की, ज्या मतदारांची नावे मतदार यादीतून डिलीट झाली. त्या व्यक्तींनाच माहित नाही की त्यांनी ती मतदार यादीतील नावे डिलीट केली. तसेच मतदार यादीतील नावे हटविण्यासंदर्भात जे अर्ज भरण्यात आले ते अर्ज ही काही सेकंदात भरून निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर भरून सब्मिट करण्यात आले. तसेच त्यानुसार आयोगाने ▶▶ पान २ वर

# परभणी, सांगली, साताऱ्यातील शेतीपिकांच्या नुकसानीसाठी १३६ कोटींची मदत

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात जून ते ऑगस्ट दरम्यान अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेतीपिकांना मोठा फटका बसला आहे. अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या परभणी, सांगली व सातारा जिल्ह्यांत १ लाख ५५ हजार ३१८ हेक्टर जमिनीवरील शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी राज्य सरकारने गुरुवारी सुमारे १३६ कोटी ३ लाख ९९ हजार रुपयांची मदत जाहिर केली. २ लाख ५२ हजार १४७ यामुळे दिलासा मिळणार आहे.**

अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील तब्बल २९ जिल्ह्यांतील १९१ तालुक्यांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. या काळात झालेल्या पावसामुळे ६५४ पेक्षा जास्त महसूल मंडळांमधील खरीप पिकांचे नुकसान झाले आहे. ▶▶ पान २ वर

# ओबीसी आरक्षणावरून बीडमध्ये दुसरी आत्महत्या

## आरक्षण गेलं, नातवाला नोकरी लागणार नाही या नैराश्यातून आजोबांनी घेतला गळफास

बीड । प्रतिनिधी

ओबीसी आरक्षण संपले आता माझ्या नातवाला नोकरी लागणार नाही. या नैराश्यातून बर्दापूर येथील निवृत्ती पांडुरंग यादव यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. निवृत्ती यादव हे गावात पारावर सुरू असलेल्या चर्चेत सहभागी होत आता ओबीसींचे आरक्षण संपले म्हणून निराशा व्यक्त करत होते. यादरम्यानच त्यांनी शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

ही घटना बीड जिल्ह्यात ओबीसी आरक्षणाशी संबंधित दुसरी आत्महत्या ठरली आहे. यापूर्वी, नाथापूर येथील एका व्यक्तीनेही ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून आत्महत्या केली होती. मिळालेल्या माहितीनुसार, निवृत्ती यादव हे बर्दापूर गावातील पारावर सुरू असलेल्या चर्चेत नियमित सहभागी होत असायचे. ते ओबीसी आरक्षण संपल्यामुळे त्यांच्या ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५३.०० क्विंटल | २,४५० | २,९२० | २,६२३ |
| ज्वारी/हायब्रिड : ८७.०० क्विंटल | २,००० | ३,०७० | २,४५२ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ३९.५० क्विंटल | ६,००० | ६,१२५ | ६,०६२ |
| उडीद : १०८.०० क्विंटल | ४,३५१ | ६,१०० | ५,२६५ |
| बाजरी: ८७.०० क्विंटल | २,००० | २,७२१ | २,५७० |
| मुग:११.५० क्विंटल | ४,४०० | ६,६५१ | ५,५५४ |
| सोयाबीन:६.०० क्विंटल | ३,८०० | ३,८०० | ३,८०० |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ४,५०० | ५,३५० | ५,०३७ |

# ना.पंकजाताई मुंडेंचा परळी, अंबाजोगाईत जनता दरबार हाऊसफुल्ल

## शिस्तबद्ध नियोजनाने जनतेच्या समस्यांचा जागेवर निपटारा



परळी वै.। प्रतिनिधी

**राज्याच्या पर्यावरण, वातारणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा आज परळी व अंबाजोगाई येथे हाऊसफुल्ल जनता दरबार झाला. त्यांना भेटून समस्या मांडण्यासाठी सर्व सामान्य नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाला वैयक्तिक भेटून त्यांची गाऱ्हाणी ऐकली व त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निपटारा केला.** ▶▶ पान २ वर

### जनतेसाठी शिस्तबद्ध नियोजन

कामे घेऊन येणारांची दरवेळेस होणारी प्रचंड गर्दी लक्षात घेऊन ना. पंकजाताईंनी या दौऱ्यात भेटीचे शिस्तबद्ध नियोजन केले होते. प्रचंड गर्दीमुळे नियोजन कोलमडते, हा अनुभव पाहून आलेल्या प्रत्येकाचे काम मार्गी लागले जावे, त्यांचे प्रश्न ऐकले जावेत यासाठी या दौऱ्यात जिल्ह्यातील सहाही मतदारसंघाला दिवस आणि वेळ निश्चित करून दिला. सकाळी परळी मतदारसंघाचा तर दुपारी अंबाजोगाई येथे केज मतदारसंघासाठी जनता दरबार घेतला. अतिशय शिस्तबद्ध रितीने कुठलाही गडबड, गोंधळ न होता सर्व सामान्य माणूस त्यांच्यापर्यंत आपल्या समस्या मांडून त्या सोडवू शकला, या नियोजनामुळे अभ्यागतांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.

# पडीक जमिनीचे अनुदान, विमा उचलून शासनाला लावला चुना

## अधिकाऱ्यांना हाताशी धरून सावकाराने घेतला फायदा

गेवराई । प्रतिनिधी

**शिरुर कासार तालुक्यातील तिंतरवणी येथिल साडे तिन एकर जमिन १२ वर्षापासून पडक जमिन असतानाही अनुदान व पिक विमा उचलुन शासनाला लाखों रुपयांचा डल्ला तलाठी, मंडलधिकारी, तहसिलदार यांना हाताशी धरुन मारला असल्याची बाब निदर्शनास आल्याने खळबळ उडाली असून संबंधित अधिकारी कर्मचारी यांची या प्रकरणी सखोल चौकशी होणार आसल्याचे समजते.**

सन १९८० साली तुकाराम नागरगोजे यांना सावकार महादेव खेडकर यांच्या नावे तिन हाजारात एक वर्षासाठी जमिन खरेदी दिली होती, मात्र परत देण्यात वेळकाढूपणा मुळे मुळ मालकांनी पडक पाडली, परंतु पडक जमिन असतानाही सावकारांनी अनुदान व पिक विमा हाडप करत महसूल प्रशासनाला लाखोंच्या चुना लावल्याने हे प्रकरण चर्चेत आले आहे. शिरुर कासार तालुक्यातील तिंतरवणी येथिल शेतकरी ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# वैचारिक प्रगल्भता रुजविण्याची जबाबदारी सगळ्यांचीच

जगाच्या केंद्रस्थानी सध्या जेन झी पिढी आहे. जेन झी म्हणजे झुमर्स. म्हणजे १९९७ ते २०१२ च्या दरम्यान जन्मलेली मुले-मुली. या पिढीने अनेक देशांमध्ये कसे सत्तांतर घडवले याच्या जोरदार चर्चा सद्या सुरु आहेत. त्यात कौतुकच जास्त आढळते. सर्जनशील युवाशक्तीच्या बळावर कोणताही देश विकासाची स्वप्ने पाहू शकतो. भारत तर विश्वगुरू होण्याची महत्वाकांक्षा राखून आहे. तथापि वैचारिक परिपक्वतेअभावी आणि ते ज्यांना नेते मानतात त्यांचे प्रभावशाली नियंत्रण नसेल तर ही पिढी भरकटत जाण्याचा आणि त्यांनी छेडलेले कोणतेही आंदोलन दिशाहीन होण्याचा धोका कोणीही नाकारणार नाही. अशी पिढी रस्त्यावर उतरली तरी सरकारी मालमत्ता भक्ष्यस्थानी पडते. जी नागरिकांच्या करातून उभी राहाते. नेपाळ हे त्याचे सध्याचे ज्वलंत उदाहरण आहे. काठमांडूचे महापौर बालेन शाह यांनी लोकांनी शांतता राखावी, असे आवाहन केले. पण विध्वंस तर घडून गेला आहे. नेपाळमधील युवांचा संताप अनाठायी नव्हता. पण आंदोलकांवर कोणाचेही नियंत्रण राहिले नव्हते. नेपाळच्या विध्वसांचे जे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले ते या अर्थाने कमालीचे निराशाजनक आणि अस्वस्थ करणारे होते. शासकीय कार्यालयांसह अनेक पायाभूत सुविधा उद्ध्वस्त आहेत. तुरुंगातून कैदी फरार आहेत. हा देश विकासाच्या रांगेत किमान पन्नास वर्षे मागे गेला असे म्हणणे वावगे ठरू नये.

भारतातही समाजमाध्यमांवरील तथाकथित अनेक प्रभावकांची (इन्फ्लुएन्सर्स) वैचारिक प्रगल्भता चर्चेचा मुद्दा ठरू शकेल. मग त्यांना मानणाऱ्यांकडून त्यापेक्षा वेगळी अपेक्षा करता येऊ शकेल का? अलीकडच्या दोन-तीन वर्षांपूर्वी एका भाऊने हजारो विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरवले होते. तेव्हाही अशीच मोडतोड झाली होती. आंदोलनातून काहीच निष्पन्न झाले नव्हते. हे लोकांच्या आठवणीत असू शकेल. तेव्हा मुद्दा आहे वैचारिक पिढी घडवण्याची जबाबदारी कोणाची? ती सामूहिक जबाबदारी आहे. पालक, समाज, राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते, सामाजिक संस्था असे कोणीही त्या जबाबदारीतून वगळले जाऊ शकणार नाही. सर्वांनी मिळून काम करणे ही काळाची गरज नेपाळने अधिकच ठसठशीत केली आहे. त्याची सुरुवात घरापासून होते. सुजाण पिढी घडवण्याची सुरुवात पालकांपासून होते. मूल्यसंस्कार करण्याची, मुलांना चांगला माणूस घडवण्याची संपूर्ण जबाबदारी शाळेवर ढकलण्याची फॅशनच अलीकडच्या काळात रुजली आहे. शाळा त्या बदलाचा एक भाग आहेत हे मात्र नक्की. पालक मुलांना पुरेसा वेळ देत नाहीत. मुले आणि पालक यांच्यातील संवाद हरवला आहे असे मानसतज्ज्ञांचे निरीक्षण आहे. त्याचा विचार पालकांनी करायला हवा. मूल्यसंस्काराचे नवनवे आणि जेन झी ला आपलेसे वाटतील असे नवमार्ग शोधण्याचे काम जाणते आणि सामाजिक संस्था करू शकतील.

सर्वच राजकीय पक्षांच्या युवा शाखा आहेत. युवाशक्तीचा राजकारणाचे हत्यार म्हणून वापरण्यात कोणताही राजकीय पक्ष मागे नाही. सामाजिक समस्या तडीला लावण्यासाठी युवा शाखा रस्त्यावर उतरतात असे वरवरचे चित्र आढळते. त्यामागचा राजकीय स्वार्थ जनतेपासून लपत नाही. राजकारण करता करता त्यांत सामाजिक भान रुजावे म्हणून किती पक्ष काम करतात? निवडणुका जवळ आल्या म्हणजे कार्यकर्ता प्रशिक्षण राबवणे म्हणजे सामाजिक भान रुजवणे नव्हे. जेन झी तंत्रज्ञानाच्या काळातच जन्मली आहे. या क्षेत्रातील त्यांचे आकलन स्तिमित करणारे आहे. तोही संवादाचा एक मार्ग ठरू शकेल. समाजमाध्यमांवर समजदार, प्रगल्भ आणि अभ्यासू प्रभाविकांची कमतरता नाही. ते आदर्श म्हणून पुढे कसे येतील, ते आणि सामान्य युवा त्यांच्या संवादाचा पूल कसा उभा राहील. प्रभावकांच्या माध्यमातून सामाजिक भान कसे रुजेल यावर सर्वांनी मिळून काम करणे जाणत्यांना अपेक्षित असेल. किंबहुना ते करावेच लागेल. वैचारिक समाजच विकासाचा मार्ग प्रशस्त करतो. भारत तर तरुणांचा देश मानला जातो. याच तरुणाईच्या बळावर महासत्ता बनू शकेल अशी आशा सातत्याने व्यक्त होते. जेन झी पिढी ताकदवान आहे. ते बदल घडवू शकतात हे अनेक देशांमध्ये अधोरेखित झाले आहे. तो बदल नकारात्मक घडवायचा की सकारात्मक या प्रश्नाचे सक्रिय उत्तर सर्वांनी मिळून शोधायला हवे. हा धडा नेपाळने घालून दिला असे म्हणणे संयुक्तीक ठरू शकेल.

# शेतकऱ्यांनी एआयचा उपयोग उत्पादन वाढीसाठी करावा-आ.प्रकाश सोळंके

## माजलगावात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मेळाव्याने दिली शेतकऱ्यांना नवी दिशा

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांनी एआय चा उपयोग उत्पादन वाढीसाठी करावा असे मत माजलगाव मतदार संघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी केले ते लोकनेते सुंदरराव सोळंके यांच्या ९८व्या जयंतीनिमित्त आणि मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना लिमिटेड सुंदरनगर आणि माजलगाव मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था मर्यादित यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य शेतकरी मेळाव्यात बोलत होते.**

या मेळाव्यामध्ये शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे दरवाजे उघडण्याची संधी निर्माण झाली आहे. विशेषतः ऊसपिकासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची ओळख करून देऊन शेतकऱ्यांमध्ये नवीन तंत्रज्ञानाबद्दल कुतूहल जागवण्याचा उद्देश यशस्वी झाला आहे. मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या शेतकऱ्यांनी या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद दिला. या मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट ऊस उत्पादन वाढविणे, पाण्याचा कार्यक्षम व योग्य वापर करणे आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करणे असे होते. एआय शास्त्रज्ञ डॉ. समाधान सुरवसे, व्हीएसआय पुणे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शेतीमधील अनुप्रयोगाबद्दल सविस्तर माहिती दिली. त्यांनी स्पष्ट केले की,



या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऊसपिकावरील रोगराईचे निदान लवकर करता येते, योग्य खतांचे नियोजन करता येते आणि सिंचनाचे वेळापत्रक ठरवता येते. आजच्या काळातील आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन शेतकऱ्यांनी कमी खर्चात जास्त उत्पादन कसे घ्यावे याचे व्यावहारिक मार्गदर्शन त्यांनी केले. शेतकऱ्यांनी त्यांचे व्याख्यान मोठ्या लक्षपूर्वक ऐकले आणि अनेक प्रश्न विचारले. डॉ. विवेक भोईटे, एआय शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र बारामती यांनी शेतकऱ्यांना मोबाइल अनुप्रयोग आणि संवेदक यंत्रणांच्या वापराबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी पाण्याच्या कार्यक्षम वापराची पद्धत शिकवली आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने पिकांची काळजी कशी घ्यावी याची व्यावहारिक माहिती दिली. उपकृषी अधिकारी आणि पोखरा तज्ञ आतिष चाटे, केसापूरी यांनी पोखरा योजनेचे फायदे सांगून शेतकऱ्यांना शेततळे बांधण्यास प्रोत्साहन दिले. त्यांनी पावसाचे पाणी साठवून ठेवल्यास वर्षभर सिंचनाची समस्या कशी सोडवता येते आणि भूजलाची पातळी कशी वाढविता येते याचे तपशीलवार स्पष्टीकरण दिले. या सर्व तज्ञांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. चेअरमन श्री. वीरेंद्र सोळंके आणि व्हाईस चेअरमन श्री. जयसिंह सोळंके यांनी शेतकरी बांधवांना आवाहन करताना म्हटले की, आजच्या काळात शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतींबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करून आपले उत्पादन वाढवावे आणि कमी खर्चात जास्त नफा मिळवावा. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे शेतीमध्ये होणाऱ्या क्रांतिकारी बदलांचा फायदा घेऊन शेतकऱ्यांनी आपल्या शेतीला नवीन दिशा द्यावी असे आवाहन केले. तर अध्यक्षीय समारोप मध्ये मोहनराव सोळंके यांनी या मेळाव्यातील मार्गदर्शन शेतकऱ्यांसाठी नक्कीच फायद्याचे ठरेल असं मत व्यक्त केलं. मेळाव्याच्या शेवटी शेतकऱ्यांनी या नवीन माहितीचे स्वागत केले आणि आपापल्या शेतीमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर करण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व सहभागी शेतकरी आणि तज्ञांनी आयोजकांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिंदफणा पब्लिक स्कूलचे सांस्कृतिक विभाग प्रमुख सखाराम जोशी यांनी तर आभार माजी जिल्हापरिषद बांधकाम सभापती जयसिंग सोळंके यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भगवानराव शेजुळ यांनी अथक परिश्रम घेतले.

## पान ६ वरून...

### बांधावर जाऊन पंचनामे होणार

(८९ टक्के) पाऊस झाला आहे . बीड तालुक्यातील सर्कलनिहाय आकडेवारीनुसार १८ सप्टेंबरपर्यंत एकूण १९९.२ मिमी पाऊस झाला असून तो सरासरीच्या १०९.६ टक्के आहे . यंदा आतापर्यंत ७ पावसाळी दिवसांची नोंद झाली आहे . वांगी येथील पाहणी करतेवेळी सरपंच कमल वाघमारे ,मंडळ अधिकारी शीतल चाटे , ग्राममहसूल अधिकारी राधिका बहिर , ग्रामपंचायत अधिकारी श्री लोमटे , सहायक कृषी अधिकारी श्री रोहिटे यांच्यासह अच्युत शेळके , तुकाराम शेळके , गोरख शेळके , आत्माराम हाडूळे, सुरेश हाडूळे , अंगद हाडूळे ,श्रीहरी शेळके , प्रशांत शेळके , महादेव शेळके उपसरपंच दिनकर शेळके , दीपक शेळके , कल्याण शेळके , वैजनाथ कुलगुडे , मच्छिंद्र यादव , काशिनाथ यादव , रोहित राऊत,अशोक शेळके , प्रकाश हाडुळे , महेश शेळके , प्रभाकर कुलगुडे , शिवाजी कोलगुडे , दत्तू यादव , अशोक गोडसे , बाळासाहेब गोडसे , बाबासाहेब शेळके हे उपस्थित होते .

------------

### युसूफवडगांव येथे

सोयाबिन काढली सुद्धा आले असते पण गेल्या पंधरा दिवसा पासून कधी पावसाची संततधार चालु आहे तर काल परवा झालेल्या अतिवृष्टीमुळे मात्र हातातोंडाशी आलेले घास पावसाने हिरावुन घेतला असेच म्हणावे लागेल तरी इतके नुकसान होऊन सुद्धा ना कृषी ना महसुलचे अधिकारी नुकसान पाहणीसाठी आले नाहीत.तरी शासनाने सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी बांधव करत आहेत.

------------

### रस्त्यावर दगडगोट्यांचा

काढण्यासाठी ग्रामपंचायतला अपयश आले.पावसाळ्यात आबालवृद्धांना या रस्त्यांवरून जाताना अनेक त्रासाला सामोरे जावे लागत होते.येथील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांनी स्वखर्चाने कामगारांकरवी हा प्रश्न सोडवला.रस्त्यावरील दगड गोटे खणून खड्डे भरण्यात आले.राममंदिरा समोरील नालीचे क्राँक्रीटीकरण चे काम ठोंबरे यांनी चालु केल्याने गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. माझे गाव स्वच्छ व सुंदर राहिल या भावनेने आपण हे काम करत असल्याचे कैलास ठोंबरे यांनी माध्यमांना सांगितले आहे.

------------

### कर्जमाफीसह, एकरी ५०

आडोळा, सोमठाणा, छोटीवाडी, आदी गावांतील शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांच्या झालेल्या नुकसानीची बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करताना केले. १७ सप्टेंबर रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने माजलगाव तालुक्यातील पूरग्रस्त व अतिवृष्टीने बाधित झालेल्या, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना मानसिक आधार देऊन झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत विश्वास दिला व शासनाने शेतकऱ्याचे संपूर्ण कर्ज माफ करून एकरी सरसकट पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने करण्यात आली तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई न दिल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र लढा उभा करून शासनाला सळो की पळो करून सोडण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी दिला त्यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे शेतकरी आघाडीचे तालुकाध्यक्ष भाई अशोक बप्पा कुलकर्णी, तालुका सहचिटणीस भाई राहुल सोळंके, अभिषेक सोळंके, मनोज वगरे, चंद्रकांत खामकर, बाबासाहेब जाधव, आण्णासाहेब वगरे, शंकर सोळंके, सुदामराव जाधव, अशोक माने, विजयकुमार सोळंके, नारायण वगरे यांच्या सह शेतकरी बांधवांची उपस्थिती होती.

------------

### अतिवृष्टीने नुकसान

यावेळी बाळासाहेब आजबे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत झालेल्या नुकसान भरपाई विषयी विचारपूस करून शेतकऱ्यांना धीर दिला शेतकऱ्यांच्या बांधावरूनच कृषीमंत्री दत्तामामा भरणे व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याशी फोनवरून माहिती देत तात्काळ नुसकानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी त्यांनी संबंधित मंत्र्याकडे केली. आष्टी तालुक्यातील डोंगरगण दादेगाव घाटा पिंपरी देवळाली धामणगाव लिमगाव कडा या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात पावसाने नुकसान झाले आहे या भागातील पिके वाहून गेले असून नदीकाठच्या जमिनीही खरडून गेल्या आहेत या सर्व भागातील नुकसानग्रस्तांचे तात्काळ पंचनामे सुरू करून सरसकट नुकसान भरपाई देण्यासाठी आपण सरकारकडे पाठपुरावा केला आहे.लवकरच सरकार मदत जाहीर करेल शेतकऱ्यांनी घाबरून न जाता नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा अतिवृष्टीमुळे भरून न निघणारे नुकसान शेतकऱ्यांचे झाले आहे गेल्या शंभर वर्षांत झाला नाही एवढ्या मोठ्या प्रमाणात पाऊस या भागामध्ये झाल्यामुळे शेतकऱ्यांवर हे संकट आले आहे या नैसर्गिक आपत्तीतून बाहेर पडून पुन्हा कामाला सुरुवात करावी खचून न जाता आलेल्या संकटाचा सामना करावा या सर्व नुकसान भरपाई बाबत आपण तहसीलदार ,कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी यांच्याशी चर्चा केली आहे त्यानीही प्रशासकीय यंत्रणेला फिल्डवर जाऊन काम करण्याचे आदेश दिले आहेतअसेही आमदार बाळासाहेब आजबे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधताना सांगितले. यावेळी या भागातील कार्यकर्ते शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------

# पत्नीचा खून करणाऱ्या पतीस जन्मठेपेची शिक्षा

**जालना । प्रतिनिधी**

**बदनापूर पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तिचा क्रूरपणे खून करणाऱ्या पतीस जालना जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. तसेच दहा हजार रुपये दंड व दंड न भरल्यास एक वर्ष अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या निकालामुळे जिल्ह्यात सर्वत्र कायदा व न्याय व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. हा ऐतिहासिक निकाल मा. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश सौ. व्ही. एम. मोहिते यांनी सुनावला. आरोपीचे नाव किशोर कचरू नावकर (वय ३८, रा. ढासला, ता. बदनापूर, जि. जालना) असे आहे.**

घटनेचा थरारक तपशील. आरोपी किशोर नावकर याने पत्नी कविता हिच्या चारित्र्यावर संशय घेत तिचा निर्घृण खून केला. कविता माहेर कंडारी खुर्द येथून आपल्या गावी ढासला येथे जात असताना कंडारी ते मालेवाडी मार्गावर गट क्र. ४०४ मधील शेतजमिनीजवळ आरोपीने मोठा दगड उचलून पत्नीच्या डोक्यावर व शरीरावर वार केले. यात कविताचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर फिर्यादी कारभारी लिंबाजी सोनवणे यांच्या तक्रारीवरून बदनापूर पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. ३७७/२०२४ नोंदविण्यात आला होता. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक डी. आर. चौरे यांनी तपास पूर्ण करून दोषारोपपत्र दाखल केले. साक्षीपुराव्याने मिळाली शिक्षा सरकारपक्षाने या खटल्यात ७ महत्त्वाचे साक्षीदार न्यायालयापुढे तपासले. यात प्रत्यक्षदर्शी विठ्ठल गणपत राठोड, पंच साक्षीदार, डॉक्टर प्रगीत व डॉ. संजय गोरे तसेच तपासी अधिकारी यांची साक्ष निर्णायक ठरली. पोलिस निरीक्षक श्री. सुदाम भागवत व तत्कालीन निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे यांचे सहकार्य विशेष महत्त्वाचे ठरले. सरकारपक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. अशोक डी. मते यांनी प्रभावीपणे युक्तिवाद मांडला.

## पान १ वरून...

### बळीराजा संकटात, राज्यात

अशी मागणी देखील जयतं पाटील यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. राज्यातील अतिवृष्टी व पुरामुळे तब्बल ३० जिल्ह्यांतील लाखो शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पिके, घरे, जनावरे, गोठे पाण्याखाली गेले असून शेतकरी संकटात सापडले आहेत. बळीराजा इतक्या अडचणीत असताना या सरकारच्या हृदयाला पाझर कसा फुटत नाही? असा प्रश्न जयंत पाटील यांनी उपस्थित केला आहे. राज्यात पावसाचे थैमान चालू असून गेल्या दोन महिन्यांत अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांतील तब्बल १७ लाख ८५ हजार हेक्टरवरील पिके बाधित झाली आहेत. मुसळधार पावसामुळे नाल्याला पूर येऊन शेतीचे आणि ओढ्यालगत असलेल्या घरांचे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिके पुर्णपणे पाण्याखाली गेली आहेत. पावसामुळे शेतातील माती वाहून गेली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात अडचणीत सापडला आहे.

----------

### अंतरवालीच्या दंगलीत

आमदार त्या बैठकीत सहभागी होता. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना वस्तुस्थिती माहित असतानाही, शरद पवार त्या ठिकाणी गेले. निवडणूक आली तर जरागे उभा राहतो. त्यामुळे जो जो जरांगेला पाठिंबा देतो त्याला निवडणुकीत धडा शिकवा असे भुजबळ म्हणाले. ते पुढे म्हणाले की, तुम्ही एकत्र आला तर काहीही अशक्य नाही. माझ्या निवडणुकीवेळी जरांगे दोन दिवस आला. मला मराठ्यांची मते मिळाली नाहीत. पण ओबीसी, एसटी, एससी आणि सर्व जाती माझ्या सोबत आल्या, अन मी जिंकलो. जेंव्हापासून हा जीआर लागू झाला आणि त्याचे अर्थ स्पष्ट झाला, तेव्हापासून ओबीसी माता, भगिनी, मुलांच्या भविष्याला धक्का लागत आहे. आमच्या सात ते आठ लोकांनी चिठ्ठी लिहून आत्महत्या केली. या लोकांनी आत्महत्या करून बलिदान दिले असे छगन भुजबळ म्हणाले. मराठा आरक्षणाचा जीआर मागे घेण्यात यावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

**बोगस प्रमाणपत्रं शोधण्यासाठी समिती नेमा**

कुणबी प्रमाणपत्र काढताना खाडाखोड करून बोगस प्रमाणपत्र काढली जात असल्याचा आरोप भुजबळांनी केला. खोटी प्रमाणपत्रं तपासण्यासाठी एक समिती नेमा, अशी मागणी त्यांनी केली. फक्त शपथपत्राच्या आधारे प्रमाणपत्र देणे हे कुठेही मान्य नाही. एका ताटात दोन जण जेवतात, त्यात तीन-चार जण आले तर कसे होईल? असा प्रश्न भुजबळांनी विचारला.

-----------

### मराठा आरक्षणाविरोधातील

केलेल्या जनहित याचिकेवरच सकाळच्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने सवाल उपस्थित केले. ओबीसी संदर्भातील शासन निर्णयाने याचिकाकर्ते बाधित कसे? असा सवाल उपस्थित करत जनहित याचिकेच्या ग्राह्यतेवरच मुंबई उच्च न्यायालयाकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शासन निर्णयाने कोणी शेड्युल कास्टमधील कोणीही बाधित झाले नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे. जनहित याचिकेच्या माध्यमातून प्रत्येक गोष्टीला आव्हान दिले जाऊ शकत नाही, असेही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले. मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती अनकड यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. या सुनावणीत महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली. शासन निर्णयाने कोणी शेड्युल कास्ट मधील कोणीही बाधित झाले नाही, असे राज्य सरकारने आपली बाजू मांडताना कोर्टात सांगितले. दरम्यान ॲड. विनीत धोत्रे यांनी जनहित याचिका दाखल केली होती. यावर मुंबई उच्च न्यायालयाने सवाल उपस्थित केला. जनहित याचिका ग्राह्य धरण्यास पात्र नसल्याचे मत मुंबई उच्च न्यायालयाने सुनावणीत व्यक्त केले. जनहित याचिका मागे घेऊन योग्य त्या खंडपीठाकडे रीट याचिका दाखल करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाने सुचवले होते.

----------

### निवडणूक आयुक्तांकडून लोकशाहीच्या

लगेच कारवाई करत ती मतदार यादीतील नावेही हटविली. त्यासाठी एका वृद्ध महिलेची चित्रफितही यावेळी दाखविण्यात आली. त्यावर सदर महिलेलाच माहित नाही की तीने काही जणांची नावे डिलीट केली आहेत. राहुल गांधी पुढे बोलताना म्हणाले की, ज्या पथकाने हे काम केले आहे, त्या पथकाने स्थानिक भागातील फोन नंबरचा वापर न करता ज्या राज्यातील मतदार यादीतील नावे कमी करायची होती त्याऐवजी शेजारील राज्यांतील मोबाईल फोन नंबरचा वापर केला जात असे. मात्र त्यासाठी ते कोणत्या लोकेशनवरून या गोष्टी केल्या जात होत्या त्याबाबतही निवडणूक आयोग बोलायला तयार नाही. पुढे बोलताना राहुल गांधी यांनी सांगितले की, यासंदर्भात कर्नाटकात आनंद मतदार संघात अशा पद्धतीच्या मतदार डिलीटसंदर्भात तक्रार करण्यात आली. तसेच या प्रकरणाचा तपास सीआयडीकडून करण्यात येत आहे. आतापर्यंत कर्नाटकच्या सीआयडीने केंद्रीय निवडणूक आयोगाला १८ वेळा नोटीस पाठवित मतदार यादीतील नावे डिलीट करण्यासाठी आणि बोगस नावे समाविष्ट करण्याठी वापरण्यात आलेला मोबाईल नंबर, त्याचे लोकेशन, त्यासाठी वापरण्यात आलेली यंत्रणा आदी गोष्टी संदर्भात माहिती मागितली होती. परंतु ती अद्याप कर्नाटकच्या सीआयडी कार्यालकडे हस्तांतरीत करण्यात आली नाही. कर्नाटकातील आनंद प्रमाणे महाराष्ट्रातील राजुरा मतदारसंघातही अशा पद्धतीने नवी मतदारांची नावे समाविष्टपणे करण्यात आल्याचे स्पष्ट केले. परंतु त्या संदर्भातही कोणताच तपास करण्यात आला नसल्याचे सांगत यासंदर्भातील काही पुरावेही पत्रकार परिषदेत दाखवून दिले. शेवटी बोलताना राहुल गांधी यांनी केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना सात दिवसांची मुदत देत सात दिवसात या प्रकरणी माहिती द्यावी असे आवाहनही यावेळी केले. तसेच राहुल गांधी म्हणाले की, हायड्रोजन बॉम्ब अद्याप फोडण्यात आला नाही. पण त्याची तयारी सुरु असल्याचे स्पष्ट केले.

**निवडणूक आयोगाच्या आतल्या माणसाकडूनच मदत**

राहुल गांधी यांनी यावेळी तंत्रज्ञानाच्या मदतीनं वोटर डिलीशन कशाप्रकारे केले जाते हे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन द्वारे पुरावे सादर करत सांगितले. त्यांनी दावा केला की, निवडणूक आयोग कशा प्रकारे वोटर डिलीट करणाऱ्यांना पाठीशी घालत आहे. राहुल गांधी यांनी आपल्याला ही सर्व माहिती मिळवण्यात निवडणूक आयोगातीलच एका व्यक्तीने मदत केल्याचा खळबळजनक दावा केला. ते म्हणाले, मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की आम्हाला निवडणूक आयोगामधूनच आतली माहिती मिळत आहे. यापूर्वी असे होत नव्हते. मात्र आता निवडणूक आयोगातील आतील माणसेच आम्हाला मदत करत आहेत. हे आता थांबणार नाही. भारतातील लोकं ही वोट चोरी मान्य करणार नाहीत. ज्यावेळी युवकांना मत चोरी होत आहे हे कळेल त्यावेळी ते सर्व ताकदीनिशी विरोध करतील.

**आरोप चुकीचा, ऑनलाईन नाव वगळणे अशक्य -; निवडणूक आयोग**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करत दोन मतदारसंघांमधून सुमारे १२ हजार मतदारांची नावे गैरमार्गाने वगळल्याचा दावा केला. कर्नाटकातील मतचोरीच्या प्रकरणात तिसऱ्या व्यक्तीने केंद्रीकृत यंत्रणेचा गैरवापर केल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. निवडणूक आयोगाने तातडीने प्रत्युत्तर देत हे आरोप चुकीचे आणि आधारहीन असल्याचे म्हटले. आयोगाने ऑनलाइन पद्धतीने नावे वगळणे अशक्य असल्याचे स्पष्ट करत आनंद मतदारसंघातील प्रकरणी एफआयआर दाखल केल्याची माहिती दिली.

--------

### मालेगाव बॉम्बस्फोट : एनआयएसह निर्दोष

जणांच मृत्यू झाला होता तर १०१ जण जखमी झाले होते.या प्रकरणी विशेष एनआयए न्यायालयाने ''केवळ संशय खऱ्या पुराव्याची जागा घेऊ शकत नाही'' असे म्हटले आणि असे निरीक्षण नोंदवले की सरकारी वकिलांनी ठोस आणि विश्वासार्ह पुरावे सादर करण्यात अपयशी ठरले. विशेष न्यायाधीश ए.के. लाहोटी यांनी तपासातील त्रुटींचा उल्लेख करून आरोपींना संशयाचा फायदा दिला. ठाकूर आणि पुरोहित यांच्याव्यतिरिक्त, निर्दोष मुक्त करण्यात आलेल्यांमध्ये मेजर (निवृत्त) रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांचा समावेश होता. केवळ एका आरोपी प्रवीण टाकळकीला शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत दोषी ठरवण्यात आले आहे.

------------

### ओबीसी आरक्षणावरून बीडमध्ये

नातवाला भविष्यात नोकरी मिळणार नाही, या विचाराने चिंताग्रस्त होते. या नैराश्यातून त्यांनी शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. गावकऱ्यांनी ही घटना घडल्याची माहिती पोलिसांना दिली. काही दिवसांपूर्वी बीड तालुक्यातील नाथापुर गावात गोरख नारायण देवडकर या ५० वर्षीय व्यक्तीने मुलीच्या नोकरीची चिंता करून आत्महत्या केली आहे.

------------

### पडीक जमिनीचे अनुदान,

तुकाराम नागरगोजे यांनी साडेतीन एकर जमीन तिन हाजारात एक वर्षासाठी सावकार महादेव खेडकर यांच्या कडे खरेदी खत करत गाहण ठेवली, एक वर्षानी सावरकरांचे पैसे परत केले, परंतु विश्वासा पोटी जमिन पुन्हा खरेदी फिरवली नाही, परंतु कालांतराने व्याजाचा तागदा सुरु झाला, त्यामुळे मुळ मालक व सावकारांच्या भांडणात जमिन पडक पडली, याच पडक जमिन वहीती दाखवत सावकारांनी तब्बल पंधरा वर्षांपासून अनुदान व पिक विमाचे लाखो रुपये उचलून महसूल प्रशासनाची धूळफेक करत फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे, या नंतर मुळ मालकांनी हा प्रकार महसूल प्रशासनाच्या निदर्शनास आणून देवुन देखील काहीच कारवाई न झाल्याने, तलाठी मंडलधिकारी, व तहसीलदार यांनी या प्रकरणात ओले हात केल्याची चर्चा होत आहे,

**तलाठी, मंडलधिकारी यांच्यावर कारवाई होणार का?**

जालना जिल्हातील पिक विमा प्रकरण ताजे आसतानाच तिंतरवणी येथिल पडक जमिन अनुदान व पिक विमा प्रकरणातील अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी जिल्हाधिकारी साहेब करणार का, विशेष म्हणजे जमिनीचे मुळ मालकांच्या वारसाने तहसीलदार यांना या प्रकरणी सखोल चौकशी करण्याचा अर्ज देवुनही तहसीलदार का कारवाई करत नाहीत, याकडे गांभिर्याने पाहाणे गरजेचे आहे.

------------

### ना.पंकजाताई मुंडेंचा परळी, अंबाजोगाईत

ना. पंकजाताई मुंडे रात्री बीड येथील कार्यक्रम आटोपून उशीरा शहरात आगमन झाले. शासकीय विश्रामगृह येथे आज सकाळी त्यांनी जनता दरबार घेतला. तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पालिकेचे मुख्याधिकारी कांबळे व अन्य अधिकारी यावेळी उपस्थित होते. आजचा दिवस परळी मतदारसंघातील अभ्यागतांसाठी राखीव ठेवण्यात आल्यामुळे त्यांना भेटण्यासाठी मतदारसंघातील नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. आलेल्या प्रत्येकांना भेटत, त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांच्या कामाचे पत्र असतील, फोन असतील किंवा वैयक्तिक काम असेल ते त्यांनी जागेवरच सोडविले. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुण्याईचा वसा अन्? वारसा जबाबदारीने पुढे नेण्याची प्रेरणा देणारी ही गर्दी होती. सत्तेतील मंत्रीपदाचा वापर तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेल असं त्या यावेळी म्हणाल्या. दरम्यान, परळीचा जनता दरबार आटोपून त्यांनी अंबाजोगाई येथे भाजपचे जिल्हा सरचिटणीस गणेश कराड यांच्या निवासस्थानी केज मतदारसंघातील सामान्य जनतेची गाऱ्हाणी ऐकली व त्यांच्या समस्यांचाही जागेवर निपटारा केला.

-----------

### परभणी, सांगली, साताऱ्यातील

यामध्ये सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर आणि मूग पिकांचे नुकसान झाले. तर, भाजीपाला, फळ पिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी आणि हळद या पिकांनाही फटका बसला. शेतीच्या नुकसानीमुळे राज्य सरकारने तातडीने पचंनामे करण्याचे आदेश दिले होते. गेल्या आठवड्यात कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे शेत पिकांच्या नुकसानीपोटी बाधितांना ७३ कोटी ५४ लाख ३ हजार मदत जाहिर केली होती.

------------


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. १९ सप्टेंबर २०२५



## थोडक्यात...



### शिवशंकर भंडारे व श्रीमती रेश्मा आळणे राष्ट्र शिल्पकार पुरस्काराने सन्मानित

माजलगाव । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी चा नेशन बिल्डर अवार्ड (राष्ट्र निर्माण पुरस्काराने ) येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयातील सहशिक्षक शिवशंकर भंडारे तसेच श्रीमती रेश्मा आळणे यांना रोटरी क्लब चे प्रांतपाल सुधीर लातुरे , उपप्रांतपाल कल्याण कुलकर्णी, ख्यातनाम साहित्यिक डॉ कैलास दौंड, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी चे अध्यक्ष विनोदकुमार बजाज, सचिव दिगंबर महाजन, प्रोजेक्ट चेअरमन सौ वर्षा सोळंके यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

राष्ट्र निर्माण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल श्रीमती रेश्मा आळणे मॅडम व शिवशंकर भंडारे सर यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर , कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा चंद्रकांत मुळे , केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक विवेक जोशी सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने, कार्यालय प्रमुख संतोष लवडकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा

माजलगाव । प्रतिनिधी



येथील कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये १७ सप्टेंबर बुधवार रोजी सकाळी ०८:०५ वाजता बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संचालक भगवानराव आगे, संजय कचरे, प्रभाकरराव होके, जुगलकिशोर नावंदर,अमोल जाधव,कदिर पठाण,सहा.सचिव रवींद्र नाईकनवरे,आडत असोसिएशनचे उपाध्यक्ष बंडू ईके,सामाजिक कार्यकर्ते भीमराव टाकणखार,नाईक शेख रहीम व सर्व कर्मचारी अधिकारी बांधव उपस्थित होते.

### जय भवानी महाविद्यालयाचा संघ आविष्कार स्पर्धेत सहभागी -प्राचार्य घाडगे सर

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने सावरकर महाविद्यालय बीड ते संपन्न होत असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आविष्कार स्पर्धेत महाविद्यालयातील विविध विभागाने आपले संशोधन पर विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला आहे हिंदी विभागाच्या वतीने हिंदी मधील रोजगाराच्या संधी अर्थशास्त्र विभागाने बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या समस्या त्या राज्यशास्त्र विभागाने एक आय भारतीय लोकशाही वर होणारा परिणाम या विषयावर आपल्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून संशोधन पर पोस्टर तयार करून उद्या दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी सावरकर महाविद्यालयात संपन्न होत असलेल्या अविष्कार स्पर्धेत सहभाग घेतला आहे महाविद्यालयाचे मार्गदर्शकाचे आणि डॉ विश्वासराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा सोमनाथ घाडगे सर नक विभागाचे विभाग प्रमुख व इंग्रजी विभागाचे व प्रमुख प्राध्यापक विनोदी कीरदक हिंदी विभागाचे विभाग प्रमुख डॉक्टर वंदन जाधव अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख व आविष्कार चे समन्वयक प्रा शिवाजीराव काकडे व प्रा पापाजी चव्हाण अर्थशास्त्र विभागाच्या वतीने अर्थशास्त्रातील बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगाराच्या समस्या या विषयावर गोष्ट सादर केले तर राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ लोखंडे व डॉ नारायण फुने यांनी यांनी ए आए मध्य लोकशाही शासन प्रणाली होणारे परिणाम या विषयावर संशोधन पर स्पष्ट राज्य सादरीकरण केले आहे महाविद्यालयाच्या वतीने समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ सुनील जाधव यांनी सुद्धा आपले संशोधन पर पोस्टर सादर केली आहे प्राचार्य विश्वास कदम सर व प्राचार्य डॉ सोमनाथ घाडगे यांनी संघप्रमुख व सहभागी विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा देऊन यशस्वी होण्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी आविष्कार मध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला आहे



माजलगाव:- लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था माजलगाव घ्या चेअरमन पदी श्री.विरेंद्रदादा सोळंके यांची निवड झाले बद्दल सत्कार करताना साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री आर.सी.बडगुजर समवेत श्री डी.एम.वरे जनरल मॅनेजर(आसवनी व उपपदार्थ),रवि देशमुख मुख्य शेतकी अधिकारी, सुरेश लगड सचिव,श्री भोसले ऊस पुरवठा अधिकारी

# लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर वारंवार अत्याचार

## मुलगी झाल्यावर आरोपीचा जबाबदारीला नकार ; आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील खर्डा परिसरात, लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणीशी वारंवार शारीरिक संबंध ठेवून तिची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे खर्डा शहरात संतापाची लाट उसळली आहे. संबंधित प्रकरणी खर्डा पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमासह भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी ही मातंग समाजातील असून, आरोपी नाना श्रीहरी भोसले (रा. मुंगेवाडी, ता. जामखेड) याने जुलै २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात फिर्यादीला लग्नाचे आमिष दाखवून खर्डा गावाजवळील जंगलात नेले आणि तिच्यावर जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतरही आरोपीने पखरुड (ता. भुम, जि. धाराशिव) येथे वेळोवेळी फिर्यादीसोबत असेच कृत्य केले.



या प्रकारामुळे फिर्यादी गर्भवती राहिली व ५ एप्रिल २०२५ रोजी अहिल्यानगर जिल्हा शासकीय रुग्णालयात तिने एका मुलीला जन्म दिला. मात्र, मुलगी झाल्यावर आरोपीने फिर्यादी व तिच्या मुलीची जबाबदारी घेण्यास नकार दिला. अखेर फिर्यादीने पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

फिर्यादीच्या तक्रारीवरून खर्डा पोलिसांनी १७ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री उशिरा आरोपीविरूद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(२)(), ६९, तसेच अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ चे कलम ३(२)(), ३(१)()()() प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली, स.पो.नि. उज्वलसिंग राजपूत करीत आहेत. आरोपीला अद्याप अटक झाली नसून, तपास पुढे चालू आहे. सदर प्रकरण गंभीर असून, आरोपीला तातडीने अटक करण्यात यावी व तपास सखोलपणे करण्यात यावा, अशी मागणी पुणे जिल्हा मानवहित लोकशाही पक्षाचे अध्यक्ष.अनिल भाऊ कांबळे व लोकशाहिर आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिति खर्डा शहर अध्यक्ष. गणेश भाऊ जाधव,यांनी केली आहे. उपस्थित.जेष्ठ नेते.विलास नाना जाधव, पत्रकार, बाळासाहेब शिंदे,लहुजी शक्ती सेना जिल्हा अध्यक्ष.लखण मिसाळ , अझाद क्रांती सेना जिल्हा अध्यक्ष.पोपट फुले,ग्रामपंचायत सदस्य..राजू मोरे. दिपक जावळे, सामाजिक कार्यकर्ते, डि,दादा डाडर,शंकर गायकवाड, किरण जाधव , समाधान जाधव,सचिन वाघमारे. पवन अडागळे.राम मोरे.अतुल पाटोळे.अदित्य साळवे.मिथुन (दादा)ढावरे , शरद खवळे, समाधान साठे ,निखिल खवळे,सूरज ससाणे, स्वप्नील खवळे,करण खवळे ,बाळू ढावरे, मुकुंद मोरे, मुकेश मोरे,

## आष्टा येथील स्वामी मठामध्ये अवतरली गंगा

**आष्टी । प्रतिनिधी**

**श्री हरिनारायण स्वामी मठ आष्टा हरिनारायण ता.आष्टी जि.बीड येथे गाभाऱ्यात गंगा अवतरीत झाली आहे. यावर्षी आष्टी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे विहीरी भरल्या आहेत, तसेच स्वामीचा गाभ्याऱ्यातही गंगा अवतरली आहे.**



दगडी बांधकाम असलेल्या या भागाऱ्यात पाणी येण्यास कुठेही जागा नसताना चहूबाजूने पाणी येते. या मठाचा इतिहास असा की सदगुरू हरिनारायण स्वामी हे वारकरी संप्रदायातील एक महान संत आहेत, ते देवर्षी नारदांचे अवतार मानले जातात त्यांनी कठोर तपश्चर्या केली, या काळात त्यांनी अनेक अभंगांची, तसेच अनेक ग्रंथांची रचना केली. त्यांचा उल्लेख दासगणू महाराजांच्या संतचरितामृत ग्रंथांत आहे, स्वामीचे महाराष्ट्रात तसेच देशभरात अनेक मठ आहेत, त्यापैकी एक मठ आष्टा हरिनारायण येथे आहे मठाचे बांधकाम ४ शतका पुर्वीचे आहे, ज्यामध्ये श्रीची सुबक मुर्ती, रुक्मिणी पांडूरंग मंदीर, रघूनाथ बाबा यांची संजीवन समाधी तसेच स्वामींचा शिष्यगणांचा समाधी आहेत. स्वामी पंढरपूर ची वारी करायचे, एके वर्षी इंद्रायणीला पुर आला असताना स्वामींकडे नावेतून दुसरीकडे जाण्यासाठी पैसे नव्हते, अशा वेळी नावाड्यांनी त्यांना नावेत घेतले नाही, तेव्हा स्वामींनी त्यांचे उपरणे अंथरूण नदीवरून प्रवास केला, तेव्हा पांडूरंगांनी प्रकट होऊन स्वामींना वचन दिले, की मी रुक्मीणी तसेच सर्व संतांसह आष्ट्यात वास करेन, त्यामुळे या गावाला धाकटी पंढरी संबोधले जाते. स्वामीचे पंढरपूर, नृसिंहपूर येथील मंदीर याची साक्ष देते ,असे अनेक चमत्कार स्वामींचे हरिनारायण महात्म्य या ग्रंथात पहावयास मिळतात. तेव्हा पासून आजतागायत आषाढी उत्सव , स्वामींची जयंती, स्वामी शिष्यांच्या जयंती पुण्यतिथी , तसेच विशेष सण उत्सव अतिषय भक्तीभावाने , दिव्यतेने संपन्न होतात.

## सारणी शाळेच्या धस,कांबळे या शिक्षकांना सन्मानपूर्वक निरोप

**बीड प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळे च्या वैजेनाथ धस आणि हारेश कांबळे या दोन्ही शिक्षकांना गावकरी तसेच ग्रामपंचायत आणि विद्यार्थ्यांतर्फे सन्मानपूर्वक भावनिक निरोप देण्यात आला.**



सारणी (सांगवी) येथील जि.प.कें.प्रा.शाळा येथे गेल्या नऊ वर्षापासून वैजेनाथ धस हे ज्ञानदानाचे कार्य करत आहेत. त्यांनी अगदी तन-मन-धनाने शाळेचा शैक्षणिक उंची वाढवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. तसेच येथील सहशिक्षक हरेश कांबळे हेही गेल्या सात वर्षापासून या शाळेवर ज्ञानदानाचे कार्य करत आहेत.धस आणि कांबळे या दोघांनी मिळून शाळेला नवचैतन्य मिळवून देण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या होत असलेल्या प्रशासकीय बदलीला गावकऱ्यांनी साथ देत गावकरी तसेच विद्यार्थ्यांना भावना अनावर झाल्या होत्या. तर शिक्षक वैजेनाथ धस आणि सहशिक्षक हरेश कांबळे यांनीही आपल्या आश्रुंना वाट रिकामी करून दिली. कारण येथील ग्रामस्थांनि आणि पालकांनी दिलेले प्रेम तसेच ग्रामपंचायत कडून वेळोवेळी मिळत असलेला सकारात्मक प्रतिसाद यामुळे त्यांना आपल्या भावना अनावर झाल्या. राहूल ओव्हाळ यांनी दोन्ही शिक्षकांना सपत्निक कपड्यांचा आहेर केला. यावेळी दोन्ही शिक्षकांना सन्मानपूर्वक गावकऱ्यामार्फत आणि विद्यार्थ्यांमार्फत निरोप देण्यात आला. याप्रसंगी दोन्ही शिक्षकांचा वारंवार कंट दाटून येत होता त्यांच्या डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते तर विद्यार्थीही आणि उपस्थित गावकऱ्यांचा हुंदका दाटून येत होता.

## माजलगाव बाजार समिती कै.वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्काराने सन्मानित

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील कृषि उत्पन्न बाजार समितीला उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र? राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने संघाचे संस्थापक वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले असुन उपसभापती श्रीहरी दिगंबरराव मोरे यांनी पुणे येथे दि.१६ सप्टेंबर मंगळवार रोजी संघाच्या सर्वसाधारण सभेत हा पुरस्कार स्विकारला.**



महाराष्ट्र? राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने उत्कृष्ट कार्य करणा-या बाजार समित्यांना हा पुरस्कार देउन सन्मानित केले जाते.माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीने वार्षीक सभा घेणे,नियमीत वेळेवर लेखापरिक्षण करणे,दोष दुरूस्ती अहवाल, शेतक-यांसाठी नाममात्र दरात भोजन व्यवस्था, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, पार्कींग व्यवस्था अशा विवीध शेतकरी हिताच्या योजना राबवत उत्कृष्ट असे कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र? राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या वतीने संघाचे संस्थापक वसंतरावदादा पाटील स्मृती पुरस्कार २०२५ ने माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीला सन्मानित करण्यात आले असुन उपसभापती श्रीहरी दिगंबरराव मोरे यांनी पुणे येथे हा पुरस्कार स्विकारला यावेळी संचालक आसाराम घायतिडक, भगवान आगे, आबाजी भोसले, संजय कचरे,सचिव एच.एन.सवणे, लेखापाल उध्दव फपाळ,नितीन पौळ,सुमित पौळ, गणपतराव कदम, दिनानाथ शेंडगे यांची उपस्थिती होती.

## खा.सोनवणे यांना स्वराज्य झेप प्रतिष्ठानच्या वतीने नुकसान भरपाई मागणीचे निवेदन

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

आष्टी,शिरूर तालुक्याप्रमाणे पाटोदा तालुक्यातही अतिवृष्टी पावसाने मोठा कहर केल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे.पाटोदा तालुक्यातील पिकांचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत अशी मागणी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्याकडे स्वराज्य झेप प्रतिष्ठान पिंपळवंडी यांच्या वतीने देण्यात येऊन पाटोदा तालुक्यातील अंमळनेर महसूल मंडळात येणारी पिंपळवंडी,अंमळनेर,कोतन व त्याखालील वाड्या-वस्त्या या परिसरात मागील तीन-चार दिवसापासून अतिवृष्टी झाली आहे.त्यामुळे या परिसरातील शेतात पाणी साचून शेतकऱ्यांची मोठी आर्थिक हानी झाली आहे,नद्या- नाल्यांना पूर आल्यामुळे,काही जमिनी खरडून गेल्या तर सोयाबीन,बाजरी,उडीद,कांदा,तुर असे विविध पिके पाण्याखाली गेले आहेत व नुकसान झाले आहे,यासंदर्भात शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी स्वराज्य झेप प्रतिष्ठान च्या वतीने व पिंपळवंडी ग्रामस्थ यांच्या वतीने खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्याकडे नुकसान भरपाई साठी निवेदन देण्यात आले,व शासनाकडे नुकसान भरपाईची मागणी करण्यात आली.




## शिवैक्य वेदमूर्ती नागनाथ महाराज स्वामींचे पाचवे पुण्यस्मरण

### हाडोंग्री येथे कीर्तन सोहळा व महाप्रसादाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

श्री. क्षेत्र कपिलधार मन्मथ स्वामी संस्थान मुख्य पूजा पुरोहित शिवैक्य वेदमूर्ती श्री नागनाथ महाराज स्वामी यांचे पाचवो पुण्यस्मरण भाद्रपद कृष्ण त्रयोदशी, शके १९४७, शुक्रवार दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी साजरे करण्यात येणार आहे.

या निमित्ताने श्री क्षेत्र शिवकडा मन्मथस्वामी तपोभूमी, हाडोंग्री येथे एकदिवसीय कीर्तन सोहळा व गुरुमाऊलींचे आशिर्वचन होणार असून भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था केली आहे. या कार्यक्रमाची सुरुवात दि. १८ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री हाडोंग्री भजनी मंडळाच्या वतीने होणाऱ्या संगीत भजनाच्या शिवजागराने होणार आहे. त्यानंतर दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता श्री शि.भ.प. माहेश्वरमुर्ती विश्वनाथ स्वामी(वडवळकर जि.लातूर) यांचे कीर्तन होईल. यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या पुण्यस्मरण सोहळयास श्री.ष.ब्र.१०८ गुरुविरुपाक्ष शिवाचार्य महाराज (जहागीरदार मठ संस्थान मानूर मठाधिपती ) व श्री.ष.ब्र डॉ. १०८ राचलिंग शिवाचार्य महाराज (परंडकर बार्शी मठ संस्थान मठाधिपती) हे शिवाचार्य उपस्थित राहणार आहेत.या सोहळयात अधिकाधिक भाविकांनी सहभागी होऊन पुण्यस्मरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी परिवारातर्फे करण्यात आले आहे.



## हैद्राबाद गॅझेटनुसार वसंत उगलेंना मिळाले पहिले कुणबी प्रमाणपत्र

### मराठवाडा मुक्तीसंग्रामदिनी उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या हस्ते झाले वितरण

माजलगाव । प्रतिनिधी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार शासनाने हैद्राबाद गॅझेटचा शासन निर्णय काढला. याच शासन निर्णयाच्या कार्यप्रणालीनुसार दि १७ सप्टेंबर बुधवार रोजी पहिले कुणबी प्रमाणपत्र देण्यात लाभार्थ्यांना देण्यात आले. मराठवाडा मुक्ती संग्रामदिनाचे औचित्य साधत उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या हस्ते लाभार्थी वसंत दगडोबा उगले यांना ते देण्यात आले.




मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाचा लढा उभारला होता. हैद्राबाद गॅझेट लागू करून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे यासाठी मनोज जरांगे यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषण सुरु केले होते. याची दखल घेत राज्यशासनाने हैद्राबाद गॅझेट लागू करण्याचा शासन निर्णय काढण्यात आला. याच शासन निर्णयानुसार मराठवाडा मुक्ती संग्रामदिनापासून कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. शासनाच्या हैद्राबाद गॅझेट शासननिर्णयाच्या कार्यप्रणालीनुसार चिंचगव्हाण (ता. माजलगाव) येथील वसंत दगडोबा उगले यांनी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर स्थानिक त्रिसदस्यीय चौकशी समिती समितीने (ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, कृषी सहायक) कागदपत्राची पडताळणी, गृह चौकशी करून तहसील कार्यालयाला अहवाल सादर केला होता. या अहवालावरून तहसील कार्यालयात नेमलेल्या चौकशी समितीने अर्जाची पडताळणी करून वरिष्ठांना पाठविला. यावरून दि १७ सप्टेंबर बुधवार रोजी हैद्राबाद गॅझेट शासननिर्णयाच्या कार्यप्रणालीनुसार विभागातील पहिले कुणबी प्रमाणपत्र निघाले. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्याहस्ते लाभार्थ्यांना ते कुणबी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.शासनाच्या हैद्राबाद गाझेट शासन निर्णयानुसार कुणबी प्रमाणपत्रासाठी आलेल्या अर्जावर स्थानिक आणि तहसील कार्यालयातील समितीने पडताळणी केली. १९६७ पूर्वीचे पुरावे, नातेवाईक, भावकीतील लाभार्थ्याचे कुणबी प्रमाणपत्र, शपथपत्र, इतर कागदपत्र पडताळून लाभार्थ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले.गौरव इंगोले, उपविभागीय अधिकारी.

## फ्लाईंग बड्र्स अकॅडमीमध्ये मराठवाडा मुक्ती दिन साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शहरातील फ्लाईंग बड्र्स अकॅडमी या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दि १७ सप्टेंबर बुधवार रोजी मराठवाडा मुक्ती दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.**



### प्राचार्या सारिका बजाज यांच्या हस्ते ध्वजारोहन

आज पावसाचे वातावरण व शाळेला सुट्टी असली तरी झेंडावंदनासाठी मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.मराठवाडा मुक्ती संग्रामातील शूरवीरांच्या बलिदानाला आदरांजली वाहून संस्थेने हा दिवस साजरा केला. कार्यक्रमाची सुरुवात मराठवाडा मुक्ती संग्रामातील अग्रगन्य नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ व ज्यांनी निजाम राजवटी विरुद्ध पोलीस ऍक्शन घेऊन निजाम राजवटीतून मराठवाडा मुक्त केला असे कणखर नेतृत्व तात्कालिन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.नंतर संस्थेच्या प्राचार्या सौ. सारिका बजाज यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले,यावेळी उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे राष्ट्रगीत गायले.या वेळी संचालक अण्णासाहेब तौर, प्रभाकर शेटे, जगदीश चांडक यांच्यासह भगवान लाटे,बालाजी गरुड,शेख आली पटेल उपस्थिती होते.यावेळी प्राचार्या सौ.सारिका बजाज यांनी मराठवाड्याच्या इतिहासाची आणि मुक्ती संग्रामातील लढ्याची माहिती देताना निजाम राजवटीतून मराठवाड्याला मुक्त करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव, दिंगबरराव बिंदू, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, बाबासाहेब परांजपे कॉ.गंगाधर अप्पा बुरांडे यांसारख्या अनेक नेत्यांनी तीव्र लढा दिला म्हणून मराठवाडा स्वतंत्र झाल्याचे सांगितले तसेच या स्वातंत्र्य लढ्यात खेड्यापाड्यातील सर्व सामान्य लढावय्या जनतेने यात सक्रिय सहभाग घेतल्याचे सांगितले. या लढ्यात अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले.या लढ्याची आठवण म्हणून मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी राष्ट्र उभारणीत सक्रिय योगदान देण्याचे त्यांनी आवाहन केले.याप्रसंगी उपप्राचार्या सौ.स्वाती बनसोडे, उपप्राचार्य गायकवाड, प्रा.सौ.ऐश्वर्या चांडक,रमेश बाहेती,मानेसर, तसेच सर्व शिक्षक-शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करून समारंभाची सांगता झाली.

# शेतकरी बांधवानो आत्महत्या करू नका आंदोलन करा

## किसान संयुक्त मोर्चाचे राष्ट्रीय नेते राकेश टिकैत यांचे आवाहन

वर्धा / प्रतिनिधी

जमिनी जबरदस्ती बळकावल्या जात आहेत. याला विरोध झाला पाहिजे, यासाठी आंदोलन उभे केले पाहिजे असे राकेश टिकैत म्हणाले. लवकरच महाराष्ट्र राज्यात देखील मोठे आंदोलन उभारले जाणार आहे. किसान संयुक्त मोर्चा आता महाराष्ट्रातील शेतकऱ्यासोबत आहे. शेतकरी बांधवानो आत्महत्या करू नका आंदोलन करा असेच आवाहन किसान संयुक्त मोर्चाचे राष्ट्रीय नेते राकेश टिकैत यांनी पत्रकार परिषदेतून केले आहे. भाजपाला मतदान करणाऱ्या शेतकऱ्यांना आंदोलनाची गरज आहे. काँग्रेसला मतदान करणाऱ्या शेतकऱ्यांनाही आंदोलनाची गरज आहे. शेतकरी कुणालाही मतदान करो पण आंदोलनसाठी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी संयुक्त किसान मोर्चासोबत उभे राहायला पाहिजे असे राकेश टिकैत म्हणाले. राकेश टिकैत म्हणाले.



ते वर्ध्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. महाराष्ट्रात सर्वात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होत आहेत? कर्ज तर संपूर्ण देशातील शेतकऱ्यांवर आहे, मग महाराष्ट्रातच कोणती अशी परिस्थिती आहे की ज्यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. याचे कारण म्हणजे महाराष्ट्रात शेतकऱ्यांचे संघटन मजबूत नाही असे वक्तव्य संयुक्त मोर्चाचे प्रमुख शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी केले. संयुक्त मोर्चाच्या नेतृत्वात शेतकऱ्यांचे संघटन मजबूत करण्याची गरज असल्याचे राकेश टिकेत यांनी सांगितले. पंजाब हरियाणामध्ये कर्ज असले तरीही जमीन आणी ट्रॅक्टरचा लिलाव होऊ शकत नाही. कारण तिथे शेतकरी संघटना मजबूत आहे. एखाद्या शेतकऱ्याचा ट्रॅक्टर लिलाव करण्यासाठी आणि जप्त करण्यासाठी कोणी आले तर संपूर्ण शेतकऱ्यांचे संघटन एकत्र येते त्याला विरोध केला जातो. त्यामुळं शेतकऱ्याला आंदोलनाशिवाय पर्याय नाही.

शेत पिकाला भाव मिळत नाही. आम्ही मेहनत करतो पण भाव मिळत नाही, याचा अर्थ शेतात पिकत नाही म्हणून भाव मिळत नाही असा नाही तर भाव देणारी सत्ता बेईमान आहे असे राकेश टिकैत म्हणाले. आमच्यासोबत धोकेबाजी कोण करतो आहे. मुंबईत राहणारा व्यापारी जर चढ्या भावात जमीन विकत घेत असेल तर त्यात मोठी गडबड आहे. मोठा स्वार्थ आहे हे शेतकऱ्यांनी समजून घेण्याची गरज असल्याचे टिकैत म्हणाले. लवकरच महाराष्ट्र राज्यात देखील मोठे आंदोलन उभारले जाणार ते यावेळी म्हणाले.

# या आहेत लिंबाच्या 'टॉप तीन जाती', जाणा



जर शेतात लिंबाची लागवड करायची असेल तर लिंबाच्या 'टॉप तीन जाती' माहिती असणे गरजेचे आहे. ज्यातून चांगले आणि वेळेत उत्पादन मिळेल.

लिंबामध्ये दोन प्रकार आहेत एक लाईम म्हणजेच पातळ सालीचे लिंबू आणि दुसरा प्रकार लेमन म्हणजेच जाड सालीचे लिंबू. महाराष्ट्र राज्यात कागदी लिंबाच्या फळांना जास्त मागणी असल्यामुळे त्यांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. लेमनची फळे लोणच्यासाठी चांगली असतात. कागदी लिंबामध्ये स्थानिक जातीपासून लागवड झालेली झाडे मोठ्या प्रमाणावर आढळतात अधिक उत्पादन देणाऱ्या फळांची उत्तम प्रत असलेल्या जाती आता प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. त्यांची निवड करणे शेतकऱ्यांना जास्त फायद्याचे ठरते. त्यापैकी काही जाती जसे प्रमालीनी, विक्रम, साई शरबती, त्यांचे गुणधर्म खालीलप्रमाणे आहेत.

प्रमालिनी : स्थानिक जातीपेक्षा ३५ ते ३९ टक्के जास्त उत्पादन देणारी. फळधारणा घोसात (गुच्छात ३ ते ७ फळे). फळधारणा जून-जुलै व नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होते. रसाचे प्रमाण ५७ टक्के.

विक्रम : स्थनिक जातीपेक्षा ३० ते ३२ टक्के उत्पादन जास्त. फळे ५ ते १० गुच्छात येतात. फळ साधारण जून-जुलै, नोव्हेंबर-डिसेंबर व नेहमीच्या हंगामा व्यतिरिक्त होते व उन्हाळ्यात फळे मिळतात

साई शरबती : पश्चिम महाराष्ट्रातील स्थानिक जातीपासून निवड पद्धतीने जात विकसीत केली आहे. फळे नियमित आकाराची जास्त विद्राव्य पदार्थ व आम्लता असलेली व अधिक उत्पादन देणारी जात. उन्हाळ्यात २५ टक्के जास्त उत्पादन मिळते. रसाचे प्रमाण ५५ टक्के. खैऱ्या रोगास प्रतिकारक.

# मिलेट मिल्क तयार करण्याची प्रक्रिया

मिलेट मिल्क घरगुती पद्धतीने तसेच व्यावसायिक प्रक्रिया पद्धतींनी तयार केले जाऊ शकते. ही प्रक्रिया भरड धान्यांपासून पोषणमूल्यांनी भरपूर आणि चविष्ट दूधासारखा द्रव तयार करण्यासाठी केली जाते. खाली टप्प्याटप्प्याने प्रक्रिया दिली आहे.

भरड धान्यांची निवड : मिलेट मिल्क तयार करताना योग्य प्रकारच्या मिलेट्सची निवड हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. चांगल्या प्रतिचे, परिपक्व आणि अशुद्धता विरहित धान्य वापरणे आवश्यक आहे. कारण यामुळे अंतिम उत्पादनाची गुणवत्ता, चव आणि पोषणमूल्ये निश्चित केली जातात. बाजारात अनेक प्रकारचे मिलेट्स उपलब्ध आहेत आणि प्रत्येक प्रकाराचे पोषणमूल्य आणि चव वेगवेगळी असते. त्यामुळे, इच्छित पोषण घटक, चव व गुणवत्ता यावर आधारित योग्य मिलेट्सची निवड केली जाते.



स्वच्छता : मिलेट मिल्क तयार करण्यापूर्वी निवडलेली धान्ये नीट स्वच्छ करणे आवश्यक असते. या टप्प्यात धान्यांमधून माती, दगड, धूळ तसेच कोणतेही परकीय घटक (जसे की गवताचे तुकडे, प्लास्टिक, इतर धान्यांचे मिश्रण) काळजीपूर्वक वेगळे केले जातात. ही प्रक्रिया मुख्यतः हाताने किंवा यांत्रिक साफसफाई उपकरणांच्या सहाय्याने केली जाते. स्वच्छतेच्या या टप्प्यामुळे दुधाच्या अंतिम स्वरूपात कोणतीही अशुद्धता राहत नाही आणि उत्पादनाची गुणवत्ता, चव व आरोग्यदृष्ट्या सुरक्षितता सुनिश्चित होते. त्यामुळे ही प्रक्रिया संपूर्ण निर्मिती प्रक्रियेतील एक अत्यावश्यक आणि मूलभूत पायरी मानली जाते.

भिजवणे : स्वच्छ केलेली भरडधान्ये ६ ते ८ तास किंवा रात्रभर पाण्यात भिजवली जातात. यामुळे ती मऊ होतात, दळायला सोपी पडतात आणि एकसंध दूध तयार होते. भिजवल्यामुळे फायटिक ॲसिडसारखे अँटी-न्यूट्रिशनल घटक कमी होतात, ज्यामुळे खनिजांचे शोषण सुधारते.

या प्रक्रियेमुळे पोषकद्रव्यांची जैव उपलब्धता व पचनास मदत करणारी संप्रेरके सक्रिय होतात. भिजवणे ही दुधाच्या चव, पोषणमूल्य व गुणवत्तेसाठी महत्त्वाची पायरी आहे.


दळणे : भिजवलेली मिलेट धान्ये १:३ किंवा १:४ प्रमाणात पाण्याच्या सहाय्याने ओल्या दळक्याने बारीक दळली जातात.

ही प्रक्रिया दूध तयार होण्याचा मुख्य टप्पा असतो. दळल्यावर मिळणारे मिश्रण एकसंध, गुठळ्याविरहीत व पोषक घटकांनी भरलेले असते. दळणीनंतर प्रथिने, खनिजे व फायबर्स पाण्यात मिसळून पोषक द्रव तयार होतो. गुठळ्या टाळण्यासाठी एकसंध दळणे गरजेचे असते. चांगल्या मिलेट दूधासाठी दळणीची गुणवत्ता महत्त्वाची ठरते.

# निलगिरी लागवड तंत्रज्ञान

निलगिरी हे झाड सदाहरीत असून सरळ व जलद वाढणारे आहे. हे झाड मूळचे ऑस्ट्रेलियातील आहे. याचे फळ मिरटेशिया आहे. निलगिरी वृक्षाच्या १४० पेक्षा जास्त प्रजाती आहेत. भारतात १८४३ च्या काळात या वृक्षाची निलगिरी पर्वत रांगेत प्रथमत: लागवड लावण्यात आली. भारतात निलगिरीच्या १६ पेक्षा जास्त प्रजाती आढळतात. निलगिरीचा पर्णभार म्हणजे शाखा विस्तार फारच माफक असतो. त्यामुळे खोड सरळ व जास्त लांबीचे असते. हा वृक्ष कृषीवनिकी पद्धतीमध्ये लावण्यास योग्य आहे. या वृक्षात ४७ अंश सेल्सिअस पर्यंत अधिकतम तापमान व तीन अंश सेल्सिअस न्यूनतम तापमान सहन करण्याची क्षमता आहे. त्याच्या वाढीसाठी ६०० ते १८०० मिमी सरासरी पर्जन्यमानाची आवश्यकता असते.

जमीन व हवामान : निलगिरी वृक्षाच्या लागवडीसाठी कोणत्याही प्रकारची वरकस, मुरमाड, रेताड काही प्रमाणात क्षारयुक्त जमीन चालते. खोल व उत्तम निचऱ्याच्या जमिनीत निलगिरीची वाढ फारच झपाट्याने होते. पावसाळ्यानंतर सिंचनाची सोय असल्यास निलगिरीचे झाड हवामानातील बदलास न जुमानता वाढ शकते. निलगिरीच्या वाढीसाठी प्रखर सूर्यप्रकाशाची गरज असते. या वृक्षात फुटवे फुटण्याची फार जास्त क्षमता असल्याने एकदा लागवड केल्यानंतर चार ते पाच वेळा तोडणी करून रोपवनांचे पुनरूज्जीवन खोडवा पद्धतीने तयार करता येते.



रोपवाटिका तंत्रज्ञान : निलगिरीची रोपवाटिका तयार करण्यासाठी कसदार, पाण्याचा निचरा होणारी जमीन असावी. बारमाही व हंगामी तणांचा त्रास असणारी जागा निवडू नये. रोपवाटिकेची जागा रस्त्याच्या जवळ, बारमाही पाण्याची सोय असलेली, प्रखर सूर्यप्रकाश व वादळापासून रोपे सुरक्षित रहातील व जनावरांचा उपद्रव होऊ नये म्हणून कुंपण असलेली असावी. निवडलेली जागा एका फुटापर्यंत नांगरून ढेकळे फोडून भुसभुशीत करावी. जमिनीचा उतार पाहून व काम करण्यास योग्य असे गादी वाफे करावे व गादी वाफ्यावर चांगले कुजलेले शेणखत पसरावे. निलगिरी वृक्षाची फळे जानेवारी ते मार्च दरम्यान तयार होतात. फळे पूर्ण पक्व होण्याच्या थोडे अगोदर गोळा करावी व सावलीत पसरून ठेवावी. एक ते दोन दिवसात फळे उघडून आतील 'बी' बाहेर पडते. हे बियाणे तीन ते सहा महिन्यापर्यंत साठवण करता येते.

रोपवाटिकेसाठी शक्यतो ताजे बियाणे वापरावे. रोपवाटिका जानेवारी ते मार्च महिन्यापर्यंत करता येते. निलगिरीचे बियाणे फार लहान असल्याने गादी वाफ्यावर टाकण्याअगोदर बारीक माती किंवा राखेमध्ये मिसळून घ्यावे. बियाणे गादीवाफ्यावर टाकल्यानंतर त्याच्यावर झाकण्यासाठी बारीक रेतीचा थर द्यावा. पाणी देताना बियाणे जागेवर रहावे यासाठी वाफ्यावर वाळलेले गवत अथवा पाचट पसरावे. 'बी' पेरल्यानंतर तीन ते चार दिवसात उगवण सुरू झाल्यानंतर गवत हलक्या हाताने अलगद काढावे. निलगिरीची रोपे नाजूक व लहान असल्याने सकाळ-संध्याकाळ गरजेनुसार झारीने वाफ्यावर पाणी द्यावे.

लागवड व व्यवस्थापन : रोपे १० ते १५ दिवसात चार ते पाच पानांची झाल्यावर अलगद काढून पॉलिथीन पिशवीमध्ये पुनर्लागवड करावी लागते. पुनर्लागवडीनंतर पिशव्या आठ ते दहा दिवस सावलीत ठेवून त्या नंतर मोकळ्या जागेत अथवा शेडनेट मध्ये ठेवाव्या. पुनर्लागणीसाठी २० बाय १४ सें.मी. आकाराच्या २०० गेजच्या पिशव्या वापराव्यात. रोपवाटिकेत रोपे उगवण झाल्यानंतर अथवा पुनर्लागण केल्यानंतर पिवळी पडू लागल्यास २० ग्रॅम फेरस सल्फेट १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

निलगिरीच्या लागवडीसाठी निरोगी बळकट, खोड व मुळांची योग्य वाढ झालेली तसेच ३० ते ४० सें.मी. उंचीची सहा ते आठ महिन्यांची रोपे निवडावीत. निलगिरीच्या लागवडीसाठी २ बाय २, ३ बाय ३ किंवा २ बाय ३ मिटर अंतर योग्य आहे. प्रत्येक झाडाला चांगल्या वाढीसाठी कमीत कमी तीन ते चार चौरस जागा असावी. उन्हाळ्यात ३० बाय ३० बाय ३० सें.मी. आकाराचे खड्डे खोदावेत. खड्डे भरताना प्रत्येक खड्ड्यात २५ ते ३० ग्रॅम मिथील पॅराथिऑनची पावडर मिसळावी. पावसाळ्याच्या सुरूवातीस चांगली ओल झाल्यानंतर रोपांची लागवड करावी.

जाती : जगात निलगिरी वृक्षाच्या १४० पेक्षा जास्त प्रजाती आहेत. भारतात निलगिरीच्या १६ पेक्षा जास्त प्रजाती आढळतात. त्यापैकी युकॅलिप्टस, कमांड्युसिस, सिट्रीडोरा, ग्लोब्युलस, ग्रॅडीस व ट्रेरीटोकॉर्नीस या जाती कोरडवाहू तसेच दुष्काळाला प्रतिकारक जाती आहेत.





### महत्वाच्या घटना

१८९३ : न्यूझीलंडमधे महिलांना मतदानाचा हक्क मिळाला.
१९५२ : विनोदी कलाकार चार्ली चैप्लिन यांना अमेरिकेत येण्यास मनाई करण्यात आली होती. त्यांच्या विरुद्ध देश विरोधी भावनाला प्रोत्साहन देण्याचा आरोप लावण्यात आला.
१९४६ : फ्रान्समधील कान्स येथे पहिला आंतरराष्ट्रीय चित्रपट समारोह झाला. दुसरे महायुद्ध सुरू असल्यामुळे याला ७ वर्षे ऊशीर झाला.
१९५७ : अमेरिकेने पहिल्यांदा भूमिगत अणुबॉम्बचाचणी केली.
१९५९ : सुरक्षिततेच्या कारणास्तव रशियाचे अध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह यांना अमेरिकेतील 'डिस्नेलँड'ला भेट देण्यास मनाई करण्यात आली.
१९८३ : सेंट किटस आणि नेव्हिसला स्वातंत्र्य मिळाले.
१९८५ : मेक्सिको देशांत झालेल्या विनाशकारी भूकंपामुळे सुमारे दहा हजार लोक मृत्युमुखी पडले होते.
२००० : भारताच्या करनाम मल्लेश्वरीने सिडनी ऑलिम्पिक स्पर्धेत वेटलिफ्टिंगमध्ये ६९ किलो वजन गटात ब्रॉन्झ पदक पटकावले आणि ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवणारी पहिली भारतीय महिला बनली.
२००१ : महात्मा गांधींच्या मूल्यांचा ब्रिटनमध्ये प्रसार करणारे कार्यकर्ते व विचारवंत डॉ. सतीशकुमार यांना 'जमनालाल बजाज पुरस्कार' जाहीर
२००७ : टी २० क्रिकेट सामन्यातील एका षटकात सहा षटकार मारणारा युवराजसिंग हा पहिला खेळाडू बनला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५१ : हेन्री (तिसरा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २ ऑगस्ट १५८९)
१८६७ : शतायुषी पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर चित्रकार, संस्कृतपंडित, वेदांचे अभ्यासक-संशोधक विद्वान व लेखक. चारही वेदांच्या शुद्ध संहिता, समग्र सार्थ महाभारत, सार्थ अथर्ववेद इ. ग्रंथ त्यांनी लिहिले. ते हिन्दी, मराठी, गुजराती भाषांत प्रसिद्ध झाले. यांपैकी काही ग्रंथांचे अनुवाद ऊर्दू, कानडी, सिंधी, तेलगू व इंग्रजीमध्येही झाले. (मृत्यू: ३१ जुलै १९६८)
१९११ : विल्यम गोल्डिंग नोबेल पारितोषिकविजेते इंग्लिश लेखक (मृत्यू: १९ जून १९९३)
१९१२ : भारतीय पशुवैद्य आणि प्राणीसंग्रहालय संस्थापक रुबेन डेव्हीड यांचा जन्म. (मृत्यू: २४ मार्च १९८९)
१९१७ : अनंतराव कुलकर्णी महाराष्ट्रातील पुणे येथे झालेल्या पहिल्या मराठी प्रकाशक संमेलनाचे अध्यक्ष, उत्तम साहित्यिक प्रकाशक व कॉन्टिनेन्टल प्रकाशन संस्थेचे संस्थापक (मृत्यू: ६ नोव्हेंबर १९९८)
१९२५ : बाबूराव गोखले नाटककार व भावगीतकार (मृत्यू: २८ जुलै १९८१)
१९२७ : ज्ञानपीठ पुरस्कार व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्याचे कवी कुँवर नारायण यांचा जन्मदिन.
१९५८ : लकी अली गायक, अभिनेता व गीतलेखक
१९६५ : भारतीय-अमेरिकन अंतराळवीर सुनिता विल्यम यांचा क्लीव्हलँड ओहायो अमेरिका येथे जन्म.
१९७७ : भारतीय क्रिकेटपटू आकाश चोप्रा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७१० : डॅनिश खगोलशास्त्रज्ञ ओले रोमर यांचे निधन.
१७२६ : खंडो बल्लाळ चिटणीस छत्रपती संभाजी व छत्रपती राजाराम यांचे स्वीय सहाय्यक (जन्म:)
१८८१ : जेम्स गारफील्ड अमेरिकेचे २० वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १९ नोव्हेंबर १८३१)
१९२५ : इंग्लिश वनस्पती वैज्ञानिक सर फ्रान्सिस डार्विन यांचे निधन.
१९३६ : पं. विष्णू नारायण भातखंडे संगीतशास्त्रकार, हिन्दुस्थानी संगीताचे प्रसारक, संशोधक व गांधर्व महाविद्यालयाचे एक संस्थापक (जन्म: १० ऑगस्ट १८६०)
१९६३ : सर डेविड लो जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार (जन्म: ७ एप्रिल १८९१ ड्युनेडिन, न्यूझीलंड)
१९८७ : नॉर्वे देशाचे पहिले पंतप्रधान एनर गेरहर्डसन यांचे निधन. (जन्म: १० मे १८९७)
१९९२ : ना. रा. तथा अण्णासाहेब शेंडे साहित्यिक, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष (जन्म:)
१९९३ : दिनशा के. मेहता निसर्गोपचार तज्ञ, महात्मा गांधींचे आरोग्य सल्लागार व निकटचे सहकारी (जन्म:)
२००२ : प्रिया तेंडुलकर रंगभूमी, चित्रपट व दूरचित्रवाणीवरील अभिनेत्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या. 'जन्मलेल्या प्रत्येकासाठी' या त्यांच्या कथासंग्रहाला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. (जन्म: १९ आक्टोबर १९५४)
२००४ : दमयंती जोशी सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना (जन्म: ५ सप्टेंबर १९२८)
२००७ : दत्तात्रेय शंकर तथा दत्ता डावजेकर ऊर्फ 'डी. डी' संगीतकार (जन्म: १५ नोव्हेंबर १९१७)
२०१४ : उप्पलपु श्रीनिवास (वय ४५) भारतीय सारंगी वादक
२०१८ : विष्णु खरे (वय ८६)भारतीय कवी आणि लेखक





# मराठवाड्यातील सामाजिक सलोख्याची वीण विसकटू देणार नाही - पालकमंत्री पंकजा मुंडे

जालना। प्रतिनिधी

मराठवाडा ही संताची भूमि आहे. संत विचार सरणीतुन आपण माणुसकी जोपासली आहे. आपण देश व मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी लढलो आहोत. आताच्या काळात वंचितांचा व सामान्यांचा वाणी व वाली होवून लढले पाहिजे. तरी मराठवाड्यातील सामाजिक सलोख्याची वीण विसकटू देणार नाही, अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली.



मराठवाडा मुक्तिसंग्राम वर्धापन दिनानिमित्त जालना शहरातील टाऊन हॉल येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जनतेला उद्देशून शुभेच्छा संदेश देताना त्या बोलत होत्या. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, नागरिक यांची उपस्थिती होती. प्रारंभी टाऊन हॉल परिसरात लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन मान्यवरांनी अभिवादन केले. यानंतर हुतात्मा स्मारक स्मृती स्तंभास पुष्पचक्र वाहून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. तर पोलिस जवानांनी हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून व पोलिस बँड पथकाने शोकधून वाजवून हुतात्म्यांना मानवंदना दिली. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त उपस्थित सर्वांना शुभेच्छा देताना पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या लढ्याला अनन्य साधारण महत्व आहे. आजच्या या मंगल दिनी मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या लढ्यात सक्रिय सहभाग असलेले महान हुतात्मे आणि स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, या लढ्यातील हुतात्मे आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या पराक्रमांचा इतिहास सुवर्ण अक्षराने लिहून ठेवावा असाच आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामात ज्या महाराष्ट्र परिषदेचे महत्वाचे योगदान आहे. त्याची सुरुवात जालना जिल्ह्यातील परतूर येथील महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनापासून झाली होती. मुक्तीसंग्रामात कोलते पिंपळगावकरांचे मोठे योगदान आहे. निजामाच्या अत्याचारातून मराठवाडा मुक्त करण्यासाठी पिंपळगावकरांनी रझाकारांविरुध्द २२ जून, १९४८ रोजी सशस्त्र लढा दिला होता. तसेच जालना जिल्ह्यात विविध ठिकाणी झालेले जंगल सत्याग्रह देखील खूपच गाजले होते. मुक्तीसंग्रामासाठी जालना जिल्ह्यातील जनतेने प्रचंड त्याग व बलिदान देवून हा लढा यशस्वी केला होता. मराठवाड्याची झाशीची राणी लक्ष्मीबाई या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जालना जिल्ह्यातील दगडाबाई शेळके यांनीही अनेक ठिकाणी निजाम विरोधी सशस्त्र लढे दिले. या लढ्याचा मुख्य हेतु हा राष्ट्रीयता आणि लोकशाहीची भावना वाढविणे हा होता. मराठवाडा मुक्तीसंग्रामात निजामाच्या जूलमी हुकूमशाही विरोधात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या संपुर्ण आयुष्याची आहुती देवून मराठवाड्याला निजामाच्या गुलामगिरीतून मुक्त केले. मराठी भाषा, मराठी संस्कृती, धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक व राजकीय हक्क प्राप्तीसाठी या भागातील जनतेने जो त्याग केला, तो सुवर्ण अक्षरांनी लिहावा असाच आहे. महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक होण्यासाठी पंतप्रधान राष्ट्रनेता नरेंद्री मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातंर्गत सेवा पंधरवाडा राबविण्यात येणार आहे. स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचे आयोजन करण्यात आले असून दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत विशेष महिला आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानअंतर्गत ग्राम विकास विभागाच्यावतीने या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत असून ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करणाऱ्या ग्राम पंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषदांना कामगिरीनूसार प्रोत्साहित करण्यासाठी हे अभियान सुरु करण्यात आले आहे. असेही त्यांनी यावेळी सांगितले.


कार्यक्रमाच्या शेवटी मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक यांच्यासह त्यांच्या वारसांची तसेच जिल्ह्यातील वीर माता, वीर पत्नी यांची पालकमंत्री मुंडे यांनी भेट घेत त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली व त्यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी नागरिकांना शासनाच्या घरपोच सेवा देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या 'जालना मित्र' पोर्टलचे पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी सुचिता सुत्रावे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# नुकसानग्रस्त भागाचे दोन दिवसांत पंचनामे पुर्ण करा

## सभापती प्रा.राम शिंदेंचे जिल्हा प्रशासनाला निर्देश

कर्जत। प्रतिनिधी

सीना नदीच्या महापुराचा नदीच्या दोन्ही तीरावरील गावांना मोठा फटका बसला. शेतकऱ्यांची प्रचंड हानी झालीणाहे. उभी पिकं वाहून गेली आहेत तसेच फळबागांचे प्रचंड नुकसान झाले. महापुरामुळे जमीनी खरडून गेल्या आहेत. या संकट काळात नुकसानग्रस्तांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे आहे.प्रशासनाने नुकसानग्रस्त भागाचे दोन दिवसांत पंचनामे पुर्ण करावेत, सीना नदीवरील भराव वाहून गेलेल्या सर्व बंधाऱ्यांची दुरूस्ती पाऊस संपताच हाती घेण्यात येईल, असा विश्वास विधानपरिषद सभापती प्रा राम शिंदे यांनी नुकसानग्रस्त भागाच्या दौर्यावेळी जनतेला दिला.





> नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात सापडलेल्या जनतेच्या पाठीशी सरकार आणि प्रशासन खंबीरपणाने उभे आहे. कोणीही खचून जाऊ नका, ऐकमेकांना सहकार्य करा. संकटकाळात मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. लवकरच सर्व पंचनामे पुर्ण होतील. कोणीही पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही. पंचनाम्याचा परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर झाल्यानंतर नुकसान भरपाई मिळावी यासाठी मी शासनाकडे पाठपुरावा करेल, पाऊस कमी होताच सीना नदीतील सर्व बंधाऱ्यांची जलसंपदा विभागाकडून दुरूस्ती हाती घेण्यात येईल.
> – प्रा राम शिंदे, सभापती,महाराष्ट्र विधान परिषद.

सभापती प्रा राम शिंदे यांनी बुधवारी सकाळी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी तसेच जिल्हा प्रशासनाच्या सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत सीना नदी काठावरील कर्जत व जामखेड तालुक्यातील नुकसानग्रस्त गावांना भेटी दिल्या. त्यांनी कर्जत तालुक्यातील नागलवाडी, नागापूर, सितपुर, निंबोडी, मलठण, तरडगाव, दिघी, चिलवडी व जामखेड तालुक्यातील चोंडी या नुकसानग्रस्त गावांची पाहणी केली. संकटात सापडलेल्या शेतकरी व नागरिकांना आधार दिला. दोन दिवसाच्या आत नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करा, कोणीही पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही याची काळजी घ्या, पंचनामे करताना जर स्टाफ कमी पडत असेल तर इतर तालुक्यातील स्टाफ या तालुक्यात वर्ग करून तातडीने परिपूर्ण पंचनामे शासनाला सादर करा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी जिल्हा प्रशासनाला दिले. महापुरामुळे काहींच्या घरात पाणी घुसले. संसारोपयी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. या बाधित कुटूंबांना तातडीने मदत करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी यांना दिल्या आहेत, असे यावेळी प्रा राम शिंदे म्हणाले. सीना नदीला आलेल्या महापुरामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच रस्ते, पूल, शाळा, आणि पायाभूत सुविधा गंभीरपणे बाधित झाल्या आहेत. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी, प्रभावित कुटुंबांना अन्न, पाणी व वैद्यकीय मदत मिळावी आणि गावांतील दळणवळण सुरळीत व्हावे, यासाठी तातडीची कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी शिंदे यांनी प्रशासनाला दिले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता विवेक माळूंदे, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव, उप अभियंता शशिकांत सुतार, उप अभियंता प्रशांत वाकचौरे, जामखेडचे प्रभारी तहसीलदार मच्छिंद्र पांडुळे, गटविकास अधिकारी शुभम जाधव, यांच्यासह महसूल, कृषी, वन व जलसंधारण विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक खेडकर, भाजपा तालुकाध्यक्ष बापुराव ढवळे, भाजपा जिल्हा सरचिटणीस पांडुरंग उबाळे, बापूसाहेब माने मिलिंद देवकर, सचिन चोरगे, दिनेश शिंदे सह कर्जत व जामखेड तालुक्यातील भाजपचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मराठवाड्यातील ओल्या दुष्काळावर तात्काळ निर्णय घ्या

## खा. कल्याण काळे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागणी

जालना। प्रतिनिधी

मराठवाड्यात मागील दोन-तीन दिवसांपासून झालेल्या अति मुसळधार पावसामुळे शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक संकट कोसळले आहे. या पार्श्वभूमीवर जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना थेट निवेदन देऊन जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तात्काळ "ओला दुष्काळ" जाहीर करावा अशी ठाम मागणी केली आहे.




डॉ. काळे यांनी मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाड्यात १२० मिमी ते २२० मिमी एवढा अति मुसळधार पाऊस झाल्याने अनेक भागांमध्ये ढगफुटीसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे शेतजमिनींवर उभ्या असलेल्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, काही ठिकाणी पिके व जमीन वाहून गेली आहे. शेतकऱ्यांची जनावरे, गोठे, शेतातील बांध व पाणीसाठ्याच्या संरचना वाहून गेल्याने शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. फक्त शेतकरीच नव्हे तर नागरी भागातही मोठी हानी झाली आहे.

अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरून घरातील संसारोपयोगी साहित्य, कपडे, विद्युत उपकरणांचे नुकसान झाले. व्यापारी आस्थापनांमध्ये पाणी शिरल्याने मोठा आर्थिक तोटा झाला असून नागरिकांच्या डोळ्यात हतबलतेचे अश्रू आहेत.

जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा. महसूल, कृषी व पशुसंवर्धन विभाग यांची संयुक्त पथके स्थापन करून तातडीने पंचनामे करावेत.

शेतकऱ्यांच्या कर्जाची तात्पुरती स्थगिती व व्याजमाफी देण्यात यावी. व्यापारी व नागरी भागातील नुकसानग्रस्तांना स्वतंत्र निधीतून तात्काळ दिलासा देण्यात यावा. सर्व प्रक्रिया पारदर्शक व जलदगतीने राबवून खऱ्या बाधितांपर्यंत मदत पोहोचावी. "ही फक्त नैसर्गिक आपत्ती नसून शेतकऱ्यांच्या आणि नागरिकांच्या आयुष्यावर आलेला प्रचंड आघात आहे.

या संकटातून त्यांना बाहेर काढण्यासाठी राज्य सरकारने तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री यांनी तत्काळ आदेश देऊन शेतकरी व नागरिकांच्या डोळ्यातील अश्रू पुसावेत, त्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी बळ द्यावे," असे डॉ. काळे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले.

# रक्तदान हेच खरे जीवनदान - भास्कर दानवे

जालना। प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर रोजी जालना येथे तेरापंथ युवक परिषद आणि भारतीय जनता पार्टी जालना महानगर तर्फे सामाजिक बांधिलकी जपत महा रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर आणि स्वच्छता अभियान या भव्य उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम गुरु गणेश भवन, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे पार पडला. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, विजय कामड, विमलताई आगलावे, माजी जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा पांगारकर, भाजपा युवानेते अक्षय गोरंट्याल, सोपान पेंढारकर ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष यांची उपस्थिती होती.



या शिबिराला नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. शेकडो तरुण, महिला व कार्यकर्त्यांनी उत्साहाने रक्तदान केले. रक्तपेढ्यांच्या माध्यमातून जमा झालेले रक्त गरजूंना उपयोगी पडणार असून या उपक्रमामुळे समाजहिताचा मोठा संदेश गेला. आरोग्य तपासणी शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने नागरिकांची मोफत तपासणी केली. रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, डोळे आदी आजारांची तपासणी करून आवश्यक त्या उपचाराचे मार्गदर्शन करण्यात आले. या अभियानात कार्यकर्त्यांनी, युवकांनी व नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला. परिसर स्वच्छ करून "स्वच्छ भारत – स्वस्थ भारत" या संकल्पनेला बळकटी देण्यात आली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तेरापंथ युवक यावेळी भाजपा जालना महानगरचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठी मेहनत घेतली. या प्रसंगी जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी सांगितले की, "पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देशाला सेवा, प्रामाणिकपणा व विकासाचे नवे बळ दिले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान, आरोग्य तपासणी व स्वच्छता यांसारखे समाजोपयोगी उपक्रम राबवून आपण समाजसेवेचा संदेश देत आहोत. जनतेच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला असून अशा उपक्रमांतून समाज अधिक सबल व निरोगी बनेल. संपूर्ण कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सामाजिक बांधिलकी जपत मोदीजींच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान, आरोग्य तपासणी आणि स्वच्छता अभियान या तिन्ही उपक्रमांद्वारे जनजागृती व सेवा करण्याचा सुंदर संदेश जालना शहरभर पोहोचविण्यात आला.

# आरटीआय कार्यकर्त्याला नगरसेवकाद्वारे अधिकाऱ्याने दिली जीवे मारण्याची धमकी

## मुख्याधिकाऱ्याच्या दालनात घडला प्रकार

जालना। प्रतिनिधी

बदनापूर येथील आरटीआय कार्यकर्ते तथा समाजसेवक अमित अय्युब यांना बदनापूर नगरपंचायत कार्यालयातच थेट मुख्याधिकारी यांच्या दालनामध्ये नगरसेवकाद्वारे एका अधिकाऱ्याने जीवे मारण्याची धमकी देण्याचा प्रकार घडला. माहिती अधिकारात माहिती मागवली असताना ती देण्याचे तर दूरच मात्र या आरटीआय कार्यकर्त्यावरच अरेरावी करण्याचा प्रकार या नगरपंचायत मध्ये घडला असून, ज्या गुंडाने धमकी दिली त्याला अधिकाऱ्यांचे पूर्ण समर्थन असल्याचा आरोप अमित आयुब यांनी केला असून, याची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे

बदनापूर येथील आरटीआय कार्यकर्ते तथा समाजसेवक अमित अय्युब शेख यांनी नगरपंचायत कार्यालय बदनापूर येथे माहिती अधिकार अर्ज देऊन नगर पंचायत मार्फत शहरभर बसविण्यात आलेल्या सौरऊर्जा चलीत पथदिवे या कामात भ्रष्टाचाराची माहिती दडलेली असल्याच्या संशयावरून या संबंधित संपूर्ण माहितीची मागणी केलेली होती, त्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार अमित शेख यांना दिशाभूल कारणाने पत्र देऊन अमित शेख यांचा माहिती मागणीचा अर्ज फेटाळून लावला. अमीत शेख यांनी मुख्याधिकारी विशाल पाटील, प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर पंचायत कार्यालय बदनापूर यांचे समोर प्रथम अपील दाखल केले, त्या अनुषंगाने दिनांक ०८.०९.२०२५ रोजी दुपारी १२ वाजता मुख्याधिकारी विशाल पाटील यांचे मुख्य दालनात सुनावणी आयोजित करण्यात आली, दरम्यान उपलब्ध कागदोपत्री पुरावे आणि अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी या नात्याने युक्तीवादाची प्रक्रिया सुरु असतांना आपण सामील असलेल्या भ्रष्टाचाराची माहिती उघड करण्याचा प्रयत्न अमित शेख हे करत असल्या कारणाने मनात राग धरून विशाल पाटील मुख्याधिकारी यांनी अमित शेख यांच्यावर रोष व्यक्त केला, सदर हालचाली वरून अमित शेख यांनी खबरदारी म्हणून त्याच्या जवळील मोबाईल कॅमेरा सुरू करून ऑन कॅमेरा सुनावणी घेण्याची विनंती अमित शेख यांनी विशाल पाटील मुखायधिकारी यांच्याकडे केली, त्या कारणाने विशाल पाटील यांनी ऑन कॅमेरा सुनावणी घेण्यास विरोध दर्शवून सुनावणी थांबवली व दालनाच्या बाहेर पडून कुणास तरी फोन केला व पुन्हा मुख्य दालनात सुनावणी सुरू झाली. काही वेळाने सुनावणी कक्ष म्हणजे मुख्याधिकारी यांच्या मुख्य दालनात पोलिस रेकॉर्ड वरील विविध गंभीर गुन्ह्यात सामील असलेला नगर सेवक शेख समीर शेख चांद हा त्या ठिकाण हजर झाला व त्याने अमित शेख यांना शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. त्याच्या या वर्तनाला विशाल पाटील मुख्याधिकारी यांचे संपूर्ण समर्थन होते, त्या वेळी अमित शेख यांनी विशाल पाटील मुख्याधिकारी यांना विचारले की तुम्ही मला मारण्यासाठी येथे गुंडांना बोलावले आहे काय, जर तसे नसेल तर आपण पोलिसांना बोलावून सदर इसमाला पोलिसांच्या ताब्यात द्या, परंतु विशाल पाटील यांनी तसे न करता गुंड नगरसेवक शेख समीर याच्यासह हातमिळवणी करून अमित शेख यांना धमक्या देण्यास सुरवात केली की या पुढे आमच्या कार्यालयात माहिती अधिकार टाकू नकोस, तू तुझे काम कर नसता तुला बघून घेईल, येथे सही कर आणि घरी जा, असे सांगितले सदर प्रकाराचा काही भाग हा अमित शेख यांनी त्यांच्या मोबाईल च्या कॅमेरा मध्ये रेकॉर्ड केलेला आहे, अशा प्रकारे भ्रष्टाचाराची माहिती उघड होऊ नये या कारणाने प्रशासकीय अधिकारी सुद्धा कशा प्रमाणे साम दाम दंड भेद या व्याखेचा वापर करून लोकशाही, पारदर्शकता, आणि उत्तरदायित्वता, हक्कांवर कशा प्रकारे गदा आणत आहेत, हे उघड झालेले आहे, सदर घटना ही नगर पंचायत कार्यालय बदनापूर सहित सबंध जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्गाची प्रतिमा मलम करणारी आहे,



सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन भ्रष्टाचाराची माहिती उघड करत असतांना यापुढे माझ्या सह इतर कोणा वर अशी परिस्थिती येऊ नये या कारणाने आपण विशाल पाटील मुख्याधिकारी तथा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला नगरसेवक शेख समीर शेख चांद यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्या संदर्भात शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याची माहिती आरटीआय कार्यकर्ते तथा समाजसेवक अमित अय्युब शेख यांनी दिली आहे.

# मराठवाडा मुक्त संग्राम दिन साजरा





घनसावंगी। प्रतिनिधी

मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कै दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय घनसावंगी येथे आज दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला. घनसावंगी येथील प्रतिष्ठित व्यापारी श्री जमील बाबा सौदागर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्री नंदकुमार देशमुख, पंचायत समितीचे माजी उपसभापती श्री प्रभाकर धाईत, माजी नगरसेवक अँड राजेश्वर देशमुख, नगराध्यक्ष श्री पांडुरंग काथले,उपनगराध्यक्ष मुमताज भाई,नगरसेवक श्री प्रल्हाद नाईक, बबनराव साळवे माजी सरपंच, प्रतिष्ठित व्यापारी श्री अंकुश मामा पवार आणि मोती सेठ जैन, माजी उपनगराध्यक्ष श्री नवाब भाई, शासकीय गुत्तेदार श्री नियाज महमद, पत्रकार श्री सुभाष बीडे, हनुमंत खोसे ,नरेंद्र जोगड ,सय्यद अहमद भाई, शेख नाजिम शेख अमीर , अफसर भाई, जब्बार शहा, स्वप्नील भाकरे, सोमनाथ साळवे, आसाराम धाईत यांचे सह सर्व युनिटचे मुख्याध्यापक - केशव अटकर, रंगनाथ पाटोळे, अब्दुल रज्जाक आणि रामप्रसाद गोरे यांचे सह अनेक मान्यवरही उपस्थित होते.या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# बांधावर जाऊन पंचनामे होणार, काळजी करू नये - तहसिलदार शेळके

## वांगी येथे बांधावर जाऊन तहसीलदार शेळके यांची पाहणी, शेतकऱ्यांना दिलासा

बीड । प्रतिनिधी

गेल्या पाच - सात दिवसांपासून सतत कोसळणाऱ्या पावसामुळे बीड जिल्ह्यात शेती, पूल व रस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वांगी येथे शेतात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला तसेच पूरामुळे बाधित झालेल्या पुलाची पाहणी केली. महसूल, कृषी विभागाचे अधिकारी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

लोकप्रतिनिधींसह प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी गावोगावी जाऊन नुकसानीचा आढावा घेत आहेत. शासनाने तात्काळ पंचनामे करून अहवाल दाखल करण्याचे निर्देश दिलेले आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर व बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तालुकास्तरीय समित्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जनतेला आवाहन केले की, '' प्रशासन आपल्या सोबत ठामपणे उभे आहे. कोणत्याही शेतकऱ्याला किंवा नागरिकाला एकटे वाटू देणार नाही. नुकसानीच्या पाहणीसाठी प्रशासन सज्ज आहे.

जिल्हा प्रशासनाच्या सूचनेनुसार तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अधिनस्त अधिकारी तातडीने पाहणी व पंचनामे करीत आहेत.



अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनीही जनतेला आवाहन केले असून आपत्तीग्रस्तांना दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे वेळोवेळी नैसर्गिक आपत्तीचा आढावा घेऊन तात्काळ सूचना देत आहेत. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे व कोणतीही अडचण तातडीने कळवावी, असे आवाहन केले आहे. नैसर्गिक आपत्तीग्रस्त पंचनाम्यासाठी ग्रामस्तरावर त्रिस्तरीय समिती कार्यरत असते. या समितीत ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांचा समावेश असतो. समितीचा अहवाल तहसीलदारामार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जातो. जिल्हाधिकारी शासनाकडे निधीची मागणी करून तो निधी थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्याची प्रक्रिया राबवितात. जिल्ह्यातील पावसाची सद्यस्थिती पाहता, बीड जिल्ह्याचा सरासरी पाऊस जून ते सप्टेंबर कालावधीत ५६६.१ मिमी इतका असतो, मात्र यंदा १८ सप्टेंबरपर्यंत एकूण ६४१.६ मिमी पाऊस झाला असून तो सरासरीच्या ११३.३ टक्के आहे. मागील वर्षी याच काळात हा पाऊस ६९२.५ मिमी म्हणजेच १२२.३ टक्के झाला होता. तालुकानिहाय पाहता धारूर तालुक्यात सर्वाधिक ७८१.६ मिमी (११६.७ टक्के), तर आष्टी तालुक्यात सर्वात कमी ४०३.६ मिमी (७३.९ टक्के) पाऊस झाला आहे. आंबाजोगाईत ७१६.४ मिमी (११३.३ टक्के), मजलगावात ६९९.३ मिमी (११३.४ टक्के), गेवराईत ६६१.२ मिमी (११२.६ टक्के), शिरूर कासार येथे ६५६.५ मिमी (१२७.३ टक्के), केज येथे ६२८.९ मिमी (१०७.८ टक्के), पाटोदा येथे ६१५.६ मिमी (११४.३ टक्के), वडवणी येथे ५३६.० मिमी (८९.२ टक्के) आणि परळी वैजापूर येथे ५५९.१ मिमी पान २ वर

# पात्रता धारण करीत नसल्याने तज्ज्ञ संचालकांची नियुक्ती रद्द करा

## सहाय्यक निबंधकांचे कै.डॉ.व्यंकटराव डावळे रूग्णलयीन कर्मचारी सहकारी पतसंस्थेला आदेश

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

पात्रता धारण करीत नसल्याने तज्ज्ञ संचालकांची नियुक्ती रद्द करा असे आदेश सहाय्यक निबंधकांनी कै.डॉ.व्यंकटराव डावळे रूग्णलयीन कर्मचारी सहकारी पतसंस्थेला दिले आहेत.

येथील कै.डॉ.व्यंकटराव डावळे कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित संस्थेत एकुण १३ संचालक आहेत. ज्यात ११ निवडलेले व २ तज्ज्ञ संचालक व कार्यलक्षी संचालक असे एकूण मिळून १३ संचालक आहेत. २०१४ या वर्षापासून स्विकृत संचालक करणे बंद केले आहे. ऐवजी तज्ज्ञ संचालक नव्याने संस्था नेमणूक करते. नियुक्ती केलेले संचालक हे पात्रता धारक नाहीत म्हणून या बाबत तक्रारदार माजी चेअरमन प्रताप चिंतामणी व महेंद्र मस्के यांनी सहाय्यक निबंधक यांना पत्र देवून कळविले होते. त्यावर सहाय्यक निबंधक यांनी तज्ज्ञ संचालक नियुक्तीबाबत संस्थेच्या उपविधी क्र.फ १.१ मधील स्पष्टीकरण क मधील दुसऱ्या परिच्छेदामध्ये नमुद केल्यानुसार सहकारी पतसंस्था/सेवक पतसंस्था/सहकारी बँका/राष्ट्रीयकृत बँका/व्यापारी बँका या मधील अनुभवी व्यक्ती, सनदी लेखापाल अशी पात्रता धारण करणाऱ्या व्यक्तीची तज्ज्ञ संचालक म्हणुन नियुक्ती करणे बाबत तरतुद स्पष्टपणे नमुद आहे. तथापि, कै.डॉ.व्यंकटराव डावळे रूग्णलयीन कर्मचारी सहकारी पतसंस्थेमध्ये तज्ज्ञ संचालक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती संस्थेच्या उपविधीतील उक्त नमुद केलेली पात्रता धारण करीत नसल्यास सदर व्यक्तीची नियुक्ती रद्द करण्याची कार्यवाही संस्था स्तरावरून तात्काळ करण्यात यावी असे आदेश सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.अंबाजोगाई यांनी दिले आहेत. या बाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना तक्रारदार माजी चेअरमन प्रताप चिंतामणी व महेंद्र मस्के यांनी सांगितले आहे की, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.अंबाजोगाई यांनी नुकतेच ४ सप्टेंबर रोजी दिलेल्या आदेशानुसार कै.डॉ.व्यंकटराव डावळे रूग्णलयीन कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे विद्यमान संचालक प्रकाश जव्हेरी यांचे पद धोक्यात आले आहे. तसेच लवकरच आणखी दोन संचालकांची पदे ही धोक्यात येणार आहेत अशी माहिती तक्रारदार माजी चेअरमन चिंतामणी व मस्के यांनी दिली आहे.

# माजी आ.भीमराव धोंडे यांचा पूरग्रस्त भागांना दौरा

## तहसिलदारांना भेटुन तातडीने मदत देण्याची मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यात झालेल्या ढगफुटी व अतिवृष्टीमुळे शेतकरी व व्यापारी बांधवांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी फळबागा, कांदा चाळ, दुकाने, रस्ते व पूल वाहून गेले आहेत. शेतकऱ्यांचे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या आपत्तीग्रस्त भागाला प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. शिरुर कासारचे तहसीलदार घोळवे यांची एका शिष्टमंडळासह भेट





घेऊन संपूर्ण परिस्थितीचा आढावा दिला. नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकरी व व्यापाऱ्यांना मदत द्यावी असे सूचित केले. यावेळी जि.प. चे माजी सदस्य रामराव खेडकर, जि.प.चे माजी सदस्य रामदास बडे, माजी सभापती प्रकाश बडे, सरपंच ज्ञानदेव केदार, माजी सरपंच भागवत वारे, बबन दहिफळे, राजाभाऊ केदार, सावळाराम जायभाय युवा नेते संतोष सानप, युवा नेते वैभव बडे, लक्ष्मण जायभाये मान्यवर उपस्थित होते.

# युसूफवडगांव येथे अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे पिक गेले पाण्याखाली

युसूफवडगाव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथे काही दिवसांपासून होत असलेल्या संततधार व अतिवृष्टीमुळे हातातोंडाशी आलेले सोयाबिन पिक पाण्याखाली गेल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावर्षी वरूणराजाने वेळेवर हजेरी लावली त्यामुळे पेरण्या देखील मर्ग नक्षत्रात उरकल्या होत्या. वेळेवर पाऊस पाणी झाल्याने सोयाबीन चे पिक जोमदार



आले होते त्यामुळे सोयाबीन चे उत्पादन वाढणार अशी शक्यता निर्माण झाली होती. वेळे पेरणी झाली असल्या कारणाने येता १०/१५ दिवसात युसुफवडगांव शिवारातील पान २ वर

# आज बोधेगावच्या शेतकऱ्यांशी मयंक गांधी संवाद साधणार

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी तालुक्यात अतिवृष्टी होऊन शेकडो शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. नद्या, नाले, ओढे तुडुंब भरून वाहिल्याने काही पाणी प्रकल्प, बंधारे वाहून गेले आहेत. नुकसान झालेला शेतकरी खचला आहे, नैराश्याच्या गर्तेत जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यांच्यात नवी उमेद जागावी, शेतकऱ्यांना दिलासा मिळावा तसेच शेतकऱ्यांचे नेमके प्रश्न व त्यावरील उपाय यावर सार्वजनिक चर्चा झाली पाहिजे. यासाठीच आज शुक्रवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता बोधेगाव येथे ''ग्राम विकास मंथन''



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी, नामांकित उद्योजक तथा समाजसेवक रमण सर, डॉ.हरिश्चंद्र वंगे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुरव रूपणर यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सरपंच माऊली तात्या गडदे, उपसरपंच तसेच ग्रामस्थांनी केले आहे.

# रस्त्यावर दगडगोट्यांचा नागरिकांना होता त्रास

## सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांनी स्वखर्चाने केले रस्ते दुरुस्त

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

दिंद्रुडच्या बहुतांश रस्त्यांची गेल्या ६ वर्षांपासून दुरावस्था झाली होती. मधोमध दगड गोट्यांचा खच ये-जा करणार्यांना त्रासदायक ठरत होता. पावसाळ्यात तर सर्वांचे बेहाल होत होते. सामाजिक कार्यकर्ते कैलास ठोंबरे यांनी पुढाकार घेत हि रस्ते दगड व खड्डेमुक्त केली.

दिंद्रुड येथे ६ वर्षांपूर्वी ग्रामपंचायतने नळ योजनेसाठी गावातील सर्व क्राँक्रीट रस्ते फोडून



खड्डे खणले ते भरल्यानंतर दगडगोट्यांना भररस्त्यात पांगवल्याने चांगला रस्ता खराब झाले. ग्रामस्थांनी रस्तादुरूस्तीची मागणी वेळोवेळ करूनही यावर तोडगा पान २ वर

# कर्जमाफीसह, एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्या - भाई ॲड.नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील गोदाकाठच्या गावात, शेतकऱ्यांच्या घरात पाणी शिरले असतानाच गंगामसला, किट्टीआडगाव सर्कल सह माजलगाव तालुक्यातील सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झालेले आहे या शिवाय शेतकऱ्यांच्या शेतातील सर्वच पिके सडून गेली आहेत, त्यामुळे संकटात सापडलेल्या



आणि सर्वस्व हरवलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई व शेतकऱ्याचे संपूर्ण कर्ज माफ करून मदतीचा हात देण्याचे व कर्तव्य बजवण्याचे काम शासनाने तत्काळ करण्याचे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी माजलगाव तालुक्यातील गंगामसला, पान २ वर

# अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागाची माजी आ.बाळासाहेब आजबे यांच्याकडून पाहणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात जवळपास ६० गावांमध्ये अतिवृष्टी व पुराचा फटका बसला आहे या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी आपण राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्याशी फोनवरून चर्चा करून



नुकसानीबाबत माहिती दिली आहे या भागातील शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावी अशी ही मागणी आपण केली असल्याचे माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी सांगितले.

आष्टी तालुक्यातील दौलावडगाव, धामणगाव, धानोरा, कडा मंडळामध्ये अतिवृष्टीने नुकसान झालेल्या देवळाली, पिंपरी घाटा, दादेगाव, डोंगरगण, धामणगाव, देवी लिमगाव कडा परिसरातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी बुधवार दिनांक १७ सप्टेंबर रोजी पाहणी केली. पान २ वर

# शहीद आंदोलकांना मुख्यमंत्र्यांनी दिला मदतीचा हात

## प्रवीण सोनवणे यांच्या कुटुंबाला दहा लाखांचा धनादेश सुपूर्द

आष्टी । प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी आत्मबलिदान देणारे आष्टी तालुक्यातील शेरीचे सुपुत्र, शहीद प्रवीण दिलीप सोनवणे यांच्या कुटुंबाला मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर दहा लाख रुपयांचा धनादेश आ.सुरेश धस, तहसीलदार वैशाली पाटील यांच्याकडुन सुपूर्द करण्यात आला. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी उभारलेल्या लढ्यामध्ये शहीद झालेल्या बांधवांना शासनाकडून आर्थिक मदत मिळत असल्याने त्यांच्या कुटुंबाला आधार देण्याचे काम मनोज दादांच्या माध्यमातून होत आहे.

मुख्यमंत्री सहायता निधीतून मिळालेल्या या मदतीबद्दल आम्ही सरकारचे, मान्यवर



अधिकारी व मित्रपरिवाराचे मनःपूर्वक आभार मानतो. मुंबईत झालेल्या मराठा आरक्षण मोर्चात माननीय मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वामुळे हे शक्य झाले. त्यांचे उपकार आम्ही आयुष्यभर विसरणार नाही, त्यांच्या ऋणात राहू. दरम्यान, मुख्यमंत्री उपसमिती प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेल्या आश्वासनानुसार ही मदत वेळेत पोहोचल्याचे सांगण्यात आले असल्याचे दीपक सोनवणे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. शहीद प्रवीण यांच्या बलिदानामुळे मराठा समाजाच्या न्याय्य मागणीला नवे बळ मिळाले असून, त्यांच्या कुटुंबाला मिळालेली ही मदत समाजातील सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. या वेळी आ.सुरेश धस तहसीलदार वैशाली पाटील, प्रशिक्षणार्थी तहसीलदार सोमेश मोहिते, नायब तहसीलदार भगीरथ धारक, सुनील रेडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. सोमवारी आष्टी तालुक्यामध्ये महाप्रलयकारी आलेल्या पु ल रामध्ये धामणगाव येथील अफरोज बागवान व घाटा पिंपरी येथील श्रावण शिंदे या दोघांचा मृत्यू झाला होता त्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून प्रत्येकी चार-चार लाख रुपयांच्या धनादेश तहसीलदार वैशाली पाटील व आमदार सुरेश धस यांच्या हस्ते देण्यात आला. या लोकांना मदत मिळावी या साठी मराठवाडा भुषण आमदार सुरेश आण्णा धस शासन दरबारी पाठपुरावा केला.

# बीएसएनएलच्या सल्लागार समितीवर प्रकाश जेधे यांची नियुक्ती

वडवणी । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या भारत संचार निगम लिमिटेड च्या() सल्लागार समिती( ) सदस्य पदी प्रकाश श्रीराम जेधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे बीएसएनएलच्या संचालक उर्वशी संघवान यांनी ही नियुक्ती केल्याचे पत्राद्वारे कळवले आहे. सदरील नियुक्ती ही बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खा. बजरंग सोनवणे यांच्या शिफारशीवरून करण्यात आलेली आहे. या नोकरीमुळे फोडणी तालुक्यातून त्यांचे कौतुक होत आहे



बाहेगव्हाण या गावाचे रहिवासी असलेले अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी या अगोदरही शरद पवार साहेबांच्या राष्ट्रवादीचे एकनिष्ठपणेने काम केले आहे कोणतीही निवडणूक असो राष्ट्रवादी पक्षचे ते पहिल्यापासून एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून त्यांच्या त्यांची ओळख आहे राष्ट्रवादी काँग्रेस फुटुन दोन गट पडले तरी त्यांनी शरद पवार साहेबांचे राष्ट्रवादी सोबत एकनिष्ठणे राहिले गेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे त्यांनी एकनिष्ठेने काम केले होते त्याचेच फळ म्हणून खा.बजरंग सोनवणे यांनी प्र.प्रकाश जेधे यांच्यावर विश्वास दाखवत त्यांची बीएसएनएलच्या सदस्यदी नियुक्ती केली आहे प्रकाश जेधे हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरचंद्र पवार पक्षा)चे सक्रिय कार्यकर्ते असून खा. बजरंग सोनवणे यांचे खंदे समर्थक आहेत. प्रकाश जेधे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरचंद्र पवार) वतीने लढवल्या जाणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये व संघटनात्मक बांधणीत महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. प्रकाश जेधे यांनी यापूर्वी वडवणी तालुका रोजगार हमी योजना समितीच्या सदस्य पदी ही काम केलेले आहे. सदरील नियुक्ती बद्दल प्रकाश जेधे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी महापालिकेला भेट देऊन जाणून घेतली शहर विकासाची प्रक्रिया

## विविध विभागांच्या कामकाजासोबतच नाविन्यपूर्ण उपक्रमांची घेतली माहिती

**पिंपरी । प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड शहरातील डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयात कला (अर्थशास्त्र) शाखेतील विद्यार्थिनींनी पिंपरी चिंचवड महापालिकेला आज भेट दिली. यावेळी त्यांना महापालिकेचे प्रशासकीय कामकाज कसे चालते, नागरिकांना महापालिकेकडून कोणकोणत्या अत्यावश्यक व इतर सुविधा दिल्या जातात, महापालिकेमध्ये कोणकोणते विभाग असतात... अशी विविध माहिती देण्यात आली.**



महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, अजय सूर्यवंशी, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी विद्यार्थिनींना महापालिकेतील विविध प्रशासकीय कामकाजाबाबत माहिती दिली. याप्रसंगी माहिती व जनसंपर्क विभागाचे मुख्य लिपिक देवेंद्र मोरे, लिपिक अभिजित डोळस, महाविद्यालयाचे प्रा. शरद जगताप, प्रा. अश्विनी घोडके यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते.महापालिकेतील स्थापत्य विभाग सर्वात प्रथम या विद्यार्थिनींना दाखवण्यात आला. येथे देवन्ना गट्टूवार यांनी शहरातील रस्ते, स्थापत्य विभाग, इमारत, बांधकाम यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर विद्यार्थिनींनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देऊन शहर नियोजन व विकासाची माहिती दिली. त्यानंतर पाणीपुरवठा व जलनि:सारण विभागात अजय सूर्यवंशी यांनी विद्यार्थिनींना शहरातील पाणीपुरवठा संरचना, पाणीपुरवठ्याचे स्रोत, वितरण व्यवस्था, पाणी साठवण व शुद्धीकरण प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती दिली. तर, प्रफुल्ल पुराणिक यांनी महापालिकेच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे आणि प्राध्यापकांचे स्वागत केले तसेच त्यांना शहराच्या वेगवान वाढीसोबतच नागरिकांच्या दैनंदिन गरजांनुसार महापालिकेच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या योजनांची व प्रकल्पांची माहिती दिली.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात विद्यार्थिनींना महापालिकेकडून करण्यात येत असलेल्या विविध विकासकामांचे, शहरासाठी उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या मूलभूत सेवांचे तसेच नाविन्यपूर्ण डिजिटल उपक्रमांची माहिती देणारी चित्रफीत दाखवण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींनी महापालिकेच्या विविध विभागांना दिलेल्या भेटीमुळे प्रशासनाचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाल्याचे समाधान व्यक्त केले.

> प्रशासकीय शैक्षणिक भेटीद्वारे विद्यार्थिनींना शासन व नागरिक यांच्यातील संवाद, शहरी विकास, पायाभूत सुविधा उभारणी तसेच प्रशासकीय पारदर्शकतेचे महत्त्व समजेल. भविष्यातील समाजकारण, शासकीय सेवेत प्रवेश किंवा सामाजिक उपक्रमात सहभाग घेण्यास इच्छुक विद्यार्थिनींसाठी हा अनुभव उपयुक्त ठरणार आहे. पाण्याचा अपव्यय टाळून पाण्याचा योग्य वापर,सांडपाणी प्रक्रिया,रेनवॉटर हार्वेस्टिंग याबाबत दिलेल्या माहितीचा प्रसार आणि प्रचार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शहरात करावा.
> – अजय सूर्यवंशी, सहशहर अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका

> महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने आज महाविद्यालयातील विद्यार्थिनींची पिंपरी चिंचवड महापालिकेला भेट आयोजित केली होती. यावेळी महापालिकेतील विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना प्रशासकीय कामकाजाबाबत सविस्तर माहिती दिली. हा अनुभव विद्यार्थिनींच्या शैक्षणिक आयुष्यात अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.
> – प्रा. शरद जगताप, डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय

> आम्ही आतापर्यंत फक्त पुस्तकातूनच महापालिकेच्या कामकाजाची माहिती घेतली होती. मात्र प्रत्यक्ष विभागांना भेट दिल्यामुळे आणि अधिकाऱ्यांसोबत थेट संवाद साधल्यामुळे खऱ्या अर्थाने प्रशासन कसे चालते, हे जाणून घेण्याची संधी मिळाली. ही भेट आमच्या भविष्यातील करिअरसाठी प्रेरणादायी ठरेल.
> – मिताली वाघ, विद्यार्थिनी, डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय

> पिंपरी चिंचवड महापालिकेला दिलेल्या भेटीतून आम्हाला शहर विकासाची संपूर्ण प्रक्रिया, त्यातील आव्हाने आणि त्यावर घेतल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती मिळाली. हा अनुभव आमच्यासाठी खूप प्रेरणादायी ठरला. यानिमित्ताने शहराच्या विकासात महापालिकेची भूमिका किती महत्त्वाची असते, हे देखील समजले.
> – ईश्वरी तलवार, विद्यार्थिनी, डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय

# पुणे स्टेशनवर जबरी चोरीचा प्रयत्न; दोन आरोपींना बंडगार्डन पोलिसांनी पकडले

पुणे – पुणे रेल्वे स्टेशनवर पहाटे एका तरुणाला मारहाण करून जबरी चोरी करणाऱ्या दोन आरोपींना बंडगार्डन पोलिसांनी ताब्यात घेतले. अंबादासजी फोटजावरे ( १९) व प्रसाद दत्तू कांबळे ( २७, दोघेही फिरस्ते, पुणे स्टेशन) अशी आरोपींची नावे आहेत. फिर्यादी संतोष अनिल जाधव (व २२, रा. गंगानगर, ता. किनवट, जि. नांदेड) हा ९ सप्टेंबर रोजी पहाटे पुणे स्टेशनवरील प्लॅटफॉर्म क्रमांक १ आणि २ वर थांबला असताना तीन अनोळखी व्यक्तींनी त्याच्याकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले.




फिर्यादी यांनी नकार दिल्यावर आरोपींनी त्याला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याचदरम्यान एका आरोपीने धारदार शस्त्राने जाधव याच्या पोटावर आणि हातावर वार करून त्याला जखमी केले.या घटनेनंतर बंडगार्डन पोलिस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला.

तपासादरम्यान अंमलदार ज्ञानेश्वर बडे, मनोज भोमरे आणि मनिष संकपाळ मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे आरोपी महेश अंबादासजी फोटजावरे (वय १९) व प्रसाद दत्तू कांबळे (वय २७, दोघेही फिरस्ते, पुणे स्टेशन परिसरात वास्तव्य) यांना अटक करण्यात आली. मात्र हा प्रकार लोहमार्ग पोलीस ठाणे हद्दीत घडल्याने पुढील तपासासाठी आरोपींना लोहमार्ग पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त अमितेश कुमार, अपर पोलीस आयुक्त राजेंद्र बनसोडे, पोलीस उपआयुक्त मिलिंद मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त संगिता आल्फान्सो शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. तपास पथकात उपनिरीक्षक स्वप्नील लोहार, प्रदीप शितोळे, सारस साळवी, महेश जाधव, ज्ञानेश्वर बडे, मनिष संकपाळ, मनोज भोकरे आणि शिवाजी सरक आदींचा समावेश होता.



# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने थोर समाजसुधारक प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

पिंपरी । प्रतिनिधी

थोर समाज सुधारक केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे अभिवादन करण्यात आले.

महापालिकेच्या सह आयुक्त मनोज लोणकर यांनी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, नगररचना विभागाच्या कार्यालयीन अधिक्षक आशा लांडे, मुख्य लिपिक सुरेखा सोमवंशी तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अभियांत्रिकी प्रवेशात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा डंका

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील विविध विद्यापीठांअंतर्गत अभियांत्रिकी पदवी (बीई/बीटेक) अभ्यासक्रमासाठी झालेल्या प्रवेश प्रक्रियेत यंदा सर्वाधिक प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झाले आहेत. या विद्यापीठाच्या अंतर्गत ७० हजार ४२० जागा उपलब्ध होत्या, त्यापैकी तब्बल ६० हजार ४८२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून राज्यातील सर्वाधिक प्रवेश विद्यापीठात झाले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दुसऱ्या क्रमांकावर लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ असून या विद्यापीठात ४३ हजार ५०९ जागांपैकी २९ हजार ९९८ विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळवला.त्यानंतर मुंबई विद्यापीठाने तिसरे स्थान पटकावले असून, तेथील महाविद्यालयांत १५ हजार ९५० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार राज्यातील १५ विद्यापीठांतर्गत एकूण २ लाख २ हजार ८८३ जागा उपलब्ध होत्या. यापैकी १ लाख ६६ हजार ७४६ जागा भरल्या गेल्या आहेत. एकूण प्रवेशात केवळ पुणे, लोणेरे आणि मुंबई विद्यापीठांचा वाटा ६४ टक्क्यांहून अधिक आहे. विदर्भातील नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने ८ हजार ८५५ (५.३ टक्के) प्रवेश नोंदवले, तर अमरावती विद्यापीठात ९ हजार २०४ (५.५ टक्के)विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात ८ हजार ८५५ (५.३ टक्के) प्रवेश झाले. सोलापूर विद्यापीठात ३ हजार १०८ (१.८ टक्के), छ.संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात २ हजार ४०१ (१.४ टक्के), तर नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात केवळ ६९९ (०.४ टक्के) प्रवेश झाले. जळगाव विद्यापीठात २ हजार २९८ (१.३ टक्के) विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. याशिवाय युनिटरी पब्लिक युनिव्हर्सिटी (१ हजार ५४९ – ०.९ टक्के), वारणा विद्यापीठ (१ हजार १७८ – ०.७ टक्के), एसएनडीटी महिला विद्यापीठ (३९५ – ०.२ टक्के), गोंडवाना विद्यापीठ (३६१ – ०.२ टक्के) तसेच आयसीटी कॅम्पस (३१० – ०.२ टक्के) यांचीही नोंद झाली आहे.प्रदेशनिहाय पाहता, पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक म्हणजे ५०.६ टक्के प्रवेश झाले आहेत. कोकण विभागाचा वाटा ३२.६ टक्के, विदर्भाचा १२.६ टक्के तर मराठवाड्यात केवळ २.३ टक्के प्रवेश नोंदवले गेले. उत्तर महाराष्ट्राचा वाटा १.६ टक्के असून, एसएनडीटी महिला विद्यापीठामुळे 'मुंबई/राज्यव्यापी' श्रेणीत ०.३ टक्के प्रवेश झाले आहेत.

# अखेर सोनाली आंदेकर पोलिसांच्या ताब्यात, आयुष कोमकर प्रकरणात मोठी कारवाई, आता संपूर्ण कुटुंब रडारवर

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात टोळी युद्धातून झालेल्या आयुष कोमकर हत्या प्रकरणात आता पुणे पोलिसांनी महत्त्वाची कारवाई करत माजी नगरसेवक वनराज आंदेकर याची पत्नी सोनाली आंदेकरला ताब्यात घेतलं आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने ही मोठी कारवाई केली आहे. सोनाली आंदेकर हिच्यासोबत कृष्णा आंदेकर याच्या पत्नीला सुद्धा सोनाली सोबत नेल्याची माहिती आहे. आयुष कोमकर हत्या प्रकरणात सध्या संपूर्ण आंदेकर कुटुंब पुणे पोलिसांच्या ताब्यात आहे. यापूर्वी कृष्णा आंदेकरने पोलिसांसमोर हजर झाला होता . वनराज आंदेकर याची पत्नी सोनाली आंदेकर ही पुणे पोलिसांच्या रडारवर होती. त्यानंतर पोलिसांनी कारवाई करत सोनाली आंदेकरला ताब्यात घेतलं आहे. पुढील कारवाई सुरु आहे.



माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांचा मुलगा गणेश कोमकर याचा मुलगा आयुष कोमकर याचा गोळीबार करून खून करण्यात आला होता. या खूनप्रकरणी आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू उर्फ सूर्यकांत राणोजी आंदेकर (७०, रा. नाना पेठ) याच्यासह १३ जणांविरोधात खून व मकोका अंतर्गत गुन्हा दाखल आहे.

**पोलिसांनी आंदेकारच्या बायकोला ताब्यात घेतलं**

पुण्यातील टोळी युद्धातून झालेल्या आयुष कोमकर हत्या प्रकरणात आता पोलिसांनी आणखी एक मोठी कारवाई केली आहे. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांची पत्नी सोनाली आंदेकर हिला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली आहे. या प्रकरणात आधीच आंदेकर कुटुंबातील अनेक सदस्य पोलिसांच्या ताब्यात असून आता संपूर्ण कुटुंबावरच कारवाई झाल्याचं चित्र आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, सोनाली आंदेकर काही दिवसांपासून पोलिसांच्या रडारवर होती. अखेर दुपारी पुणे क्राइम ब्रँचने सोनाली आंदेकरला राहत्या घरातून ताब्यात घेतले. तिच्यासोबत कृष्णा आंदेकर याच्या पत्नीला देखील चौकशीसाठी नेण्यात आले असल्याची माहिती आहे. सध्या आंदेकर कुटुंबातील सदस्यांवर पोलिसांकडून चौकशी सुरू आहे.

**हत्येचा कट रचल्याचा आरोप**

आयुष कोमकरच्या हत्येनंतर त्याच्या आईने दाखल केलेल्या तक्रारीत सोनाली आंदेकरवर थेट आरोप करण्यात आला होता. तक्रारीनुसार, आयुषच्या हत्येचा कट रचण्यात सोनाली आंदेकरचाही सहभाग होता. पोलिसांनाही त्याबाबत संशय होता आणि तपासादरम्यान पुरावे हाती लागताच पोलिसांनी तिच्यावर कारवाई केली. विशेष म्हणजे, सोनाली आंदेकरला येणाऱ्या महापालिका निवडणुकीत अजित पवार गटाकडून उमेदवारी मिळणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. निवडणुकीसाठी तयारीही सुरू झाल्याची माहिती होती. मात्र, या खूनप्रकरणात तिचे नाव पुढे आल्यानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

# चक्क पोलिसावर हनीट्रॅप, कंडक्टर महिलेचा कारनामा; सोफा, कुलर, होम थिएटर, दागिने उकळले

पुणे । प्रतिनिधी

फोनवर बोलताना झालेल्या ओळखीतून तिने एका पोलिस कर्मचार्याला हनीट्रॅपमध्ये अडकविले. त्यानंतर जवळीक साधून आपल्या घरी बोलावून शारीरिक संबंध ठेवायला भाग पाडले. यानंतर पोलिसाला बलात्काराची खोटी केस दाखल करण्याची धमकी देऊन त्याच्याकडून खंडणीस्वरूपात सोफा, कुलर, होम थिएटर, सोने–चांदीचे दागिने अशा पावणेदोन लाख रुपये किमतीच्या वस्तू खरेदी करून घेतल्या. मात्र, पोलिसाने आणखी पाच लाख रुपयांची खंडणी देण्यास नकार देताच त्याच्याविरुद्ध बलात्कार आणि अ‍ॅट्रॉसिटीचा गंभीर गुन्हा दाखल केला.


दरम्यान, या महिलेने अशाच प्रकारे हनीट्रॅमध्ये अडकवून कंधार आणि नांदेडमधील दोन तरुणांवर बलात्कार, अ‍ॅट्रोसिटीचा गुन्हा दाखल केल्याचे पोलिसांच्या चौकशीत समोर आले अन् अखेर तिचे बिंग फुटले. याबाबत आंबेगावमधील ३१ वर्षांच्या पोलिस कर्मचार्याने भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी आळंदीतील महिलेवर गुन्हा दाखल करून तिला अटक केली आहे. हा प्रकार ५ नोव्हेंबर २०२३ ते ७ नोव्हेंबर २०२४ दरम्यान या महिलेच्या घरी घडला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे राज्य राखीव पोलिस बल (एसआरपीएफ) गट क्रमांक एक येथे कर्तव्यावर आहेत. तर आरोपी महिला पीएमपीमध्ये वाहक म्हणून नोकरीस आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये ते भोसरीत बंदोबस्तावर होते. विश्रांतीसाठी थांबलेल्या ठिकाणी एका पीएमपी बसचालकाने त्यांच्या मोबाईलवरून आपल्या वाहक महिला सहकार्याला फोन केला होता. चार दिवसानंतर फिर्यादीला त्याच मोबाईल क्रमांकावरून फोन आला. आरोपी महिलेने आपले नाव सांगून ती पीएमपीमध्ये कंडक्टर (वाहक) असल्याचे सांगितले. त्यानंतर तिने फिर्यादीसोबत विविध कारणाने जवळीक निर्माण केली. कधी मदतीच्या बहाण्याने तर कधी अन्य कारण सांगून ती फिर्यादीला आपल्याकडे बोलावू लागली.

एकेदिवशी शेजारील एक व्यक्ती त्रास देत असल्याचे कारण सांगून आरोपी महिलेने फिर्यादीला आपल्या आळंदीतील घरी बोलावून घेतले. तिने फिर्यादीला प्रेमाच्या जाळ्यात खेचून शरीरसंबंध ठेवण्यास प्रवृत्त केले. बाहेर फिरण्यासाठी तसेच हॉटेलमध्ये जेवणासाठी गेल्यानंतर महिलेने फिर्यादींसोबत फोटो काढले होते. सहा महिन्यांनंतर आरोपी महिलेला फिर्यादीला दोघांचे फोटो त्यांच्या घरच्यांना पाठवून देण्याच्या धाकाने ब्लॅकमेल करू लागली. तू माझ्यावर जबरदस्तीने बलात्कार केला, असे धमकावून फिर्यादीच्या फायनान्सच्या खात्यावरून कुलर, मोबाईल, होम थिएटर, सोने–चांदीचे दागिणे अशा एक लाख १५ हजार रुपयांच्या वस्तू खंडणीस्वरूपात खरेदी करून घेतल्या. त्यानंतर ५७ हजार ३०० रुपये ऑनलाईन स्वरूपात घेतले. फिर्यादीने कोठे तक्रार देऊ नये म्हणून काही पैसे महिला त्यांना परत पाठवित होती.सतत होणार्या त्रासाला वैतागून फिर्यादीने महिलेसोबत संबंध तोडून टाकण्याचे ठरविले असता, त्यांच्याकडे तिने पाच लाखांच्या खंडणीची मागणी केली. अन्यथा, पोलिसात बलात्काराचा गुन्हा दाखल करेन, असे धमकाविले. परंतु, फिर्यादींनी पाच लाख रुपये देण्यास नकार दिला असता, तिने त्यांच्याविरुद्ध विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात ८ फेब्रुवारी २०२५ रोजी बलात्कार, अ‍ॅस्ट्रॉसिटीसारखा गंभीर स्वरूपाचा खोटा गुन्हा दाखल केला. या घटनेनंतर फिर्यादी चौकशी केल्यावर या महिलेने अशाच प्रकारे २०१७ मध्ये नांदेडमधील एक तरुण व २०२२ मध्ये कंधारमधील एका तरुणाला आपल्या जाळ्यात अडकवून स्वखुशीने शरीरसंबंध ठेवून त्यांच्याकडून खंडणी उकळली. त्यांच्याविरुद्ध बलात्कार व अ‍ॅस्ट्रॉसिटीचे गुन्हे दाखल केले आहेत. या महिलेने फिर्यादी यांच्यासह इतरांची फसवणूक करून धमकी देऊन खंडणी उकळल्याने तिच्यावर गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलिस निरीक्षक विश्वास भाबड तपास करीत आहेत.

# शिवचरित्रकार, इतिहास संशोधक गजानन मेहेंदळे कालवश; ७८ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

पुणे: ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि शिवचरित्रकार गजानन भास्कर मेहेंदळे (वय ७८) यांचे बुधवारी सायंकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने पुण्यामध्ये निधन झाले. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळात ठेवण्यात येणार आहे. गेली ५० वर्षे त्यांनी इतिहासाच्या संशोधन कार्याला वाहून घेतले होते.



शिवचरित्र आणि युद्ध इतिहासाचे ते गाढे अभ्यासक होते. त्यांनी शिवचरित्रावर मराठी आणि इंग्लिशमध्ये मोठे ग्रंथ लिहिले आहेत, जे आज इतिहास क्षेत्रामध्ये जगप्रसिद्ध आहेत. ते क्रियाशील संशोधक होते. फारसी, मोडी, इंग्लिश, फ्रेंच, जर्मन अशा विविध भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. इतिहासातील सत्य आणि असत्य हे उघड करणं हा त्यांचा आवडता विषय होता. सध्या ते इस्लामची ओळख आणि औरंगजेब या विषयावर संशोधन आणि लिखाण करत होते. १९७१ च्या युद्धात बांगलादेश आणि पाकिस्तान या दोन्ही सीमेवर युद्ध पत्रकार म्हणून स्वतः हजर होते, आणि त्यांचा त्यावरही अभ्यास होता.

गजानन मेहेंदळे मिलिटरी सायन्सचे द्विपदवीधर होते. त्यांचा अनेक भाषांवर आणि इतिहासातल्या लिप्यांचा अभ्यास होता. त्यांनी शिवाजी झाला नसता तर, टिपू ज अ वॉर, शिवाजी लाईफ अँड टाईम, शिवचरित्र, मराठ्यांचे आरमार अशी अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांचा भांडारकर संस्था, भारत इतिहास संशोधक मंडळ तसेच विविध संस्थांशी निकटचा संबंध होता. सध्या त्यांचे दुसऱ्या महायुद्धावरच्या पुस्तकाचे काम सुरू होते, ज्याची सुमारे पाच हजार पाने लिहून प्रकाशित होण्यासाठी तयार झालेली आहेत.

# शहरातील हजारो चौरस फुटावरील अतिक्रमण हटवले

पुणे । प्रतिनिधी

शहरातील अतिक्रमणांमुळे वाहतुकीचा खोळंबा होत असताना महापालिका प्रशासनाने आज (ता. १९) औंध बाणेर, धनकवडी–सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत जोरदार अतिक्रमण कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये सुमारे ७० हजार चौरस फुटावरील अतिक्रमण काढण्यात आले. यात ९८ शेड, दुकाने काढून टाकण्यात आले आहेत.



आयुक्त नवल किशोर राम यांच्या सूचनेनुसार अतिक्रमण निर्मूलन मोहिमेला गती देण्यात आली आहे. गुरुवारी दुपारी शहरात जोरदार पाऊस पडत असतानाही अतिक्रमण, बांधकाम विभागाने संयुक्तपणे कारवाई केली.

औंध–बाणेर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते खडकी रेल्वे स्टेशन तसेच भाऊ पाटील रस्ता, हॅरिस पूल परिसरातील अनधिकृत बांधकामे, शेडवर हातोडा चालवण्यात आला. या कारवाईत सुमारे ९८ शेड, दुकाने, हॉटेल व कच्ची–पक्की बांधकामे पाडण्यात आली. तंबू, लोखंडी जाळ्या, फर्निचर, काउंटर इत्यादी साहित्य जप्त करत तब्बल ६७ हजार ३६५ चौरस फूट जागा मोकळी करण्यात आली.

धनकवडी–सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील कात्रज चौक परिसरातही मोठी कारवाई झाली. उपायुक्त संदीप खलाटे, परिमंडळ उपायुक्त विजयकुमार थोरात व सहाय्यक आयुक्त सुरेखा भणगे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने २५०० चौरस फूट अतिक्रमण हटवून पाच ट्रक साहित्य जप्त केले.दरम्यान, मंगळवार व बुधवारी शहरातील प्रमुख रस्ते व पदपथांवरील ३१ हजार ७०० चौरस फूट अतिक्रमणे काढण्यात आली. या मोहिमेत १३ हातगाड्या, ४१ पथाऱ्या, १० गॅस सिलिंडर, ८८ झोपड्या आणि ८३ अन्य अनधिकृत दुकानांवर कारवाई झाली.

महापालिकेकडे नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर आलेल्या तक्रारींनंतर ही कारवाई करण्यात आली असून, पुढील काळात अशा मोहिमा सातत्याने सुरू राहणार असल्याचे उपायुक्त खलाटे यांनी सांगितले.

## अतिक्रमण पुन्हा जैसे थे

सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत चार दिवसांपूर्वी धायरी गाव, उंबऱ्या गणपतीच्या परिसरात मोठी अतिक्रमण करवाई करण्यात आली होती. त्यामध्ये दुकाना पुढील शेड, भर चौकातील वडापाव व अन्य वस्तू विक्रीच्या स्टॉलवर कारवाई करण्यात आली होती. पण ही कारवाई झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा उंबऱ्या गणपती चौकात अतिक्रमणे थाटली आहेत. त्यामुळे कारवाई करून काहीही फरक पडलेला नाही.